परमपिता शिव परमात्मा

अमृत कुंभ

ज्ञान - ज्ञानेश्वरी सरस्वती

वर्ष १४ | अंक २ | जून - जुलै २०२० | मूल्य रु. १३/-

घाटकोपर – गरजूंना संस्थेद्वारे अन्नधान्य वाटप करताना ब्रह्माकुमारी बहीण.

उदगीर – गरजू लोकांना मदत करण्यासाठी तहसीलदारांना धान्य सुपूर्द करताना ब्र. कु. महानंदा.

पूर्णा (परभणी): जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करताना ब्र. कु. प्रणिता, ब्र. कु. सोनल, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती भ्रा. बी. आर. देसाई, सरपंच भ्रा. साहेबराव देसाई.

डोंबिवली – कोरोना महामारीच्या सेवेत उपस्थित असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना संस्थेद्वारे अन्नधान्य वाटप करताना ब्र. कु. संगीता, ब्र. कु. तेजा व ब्र. कु. किरण.

तुमसर (भंडारा) – कोरोना महामारीच्या सेवेत उपस्थित असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचे सेवाकेंद्राद्वारे सन्मान केल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र. कु. शक्ति, ब्र. कु. दिव्यता व पोलीस स्टाफ.

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

अमृतकुंभ

अंतरंग

वर्ष १४, अंक २. जून – जुलै २०२०

मुखपृष्ठाविषयी

आपल्या त्याग व साधनेच्या ओजाने, संपर्कात आलेल्या प्रत्येकाचे जीवन मातेश्वरींनी प्रभावित केले. त्यांचे प्रेम मातेप्रमाणे निर्मल व निरपेक्ष होते. परमात्मा शिवाच्या शिकवणुकीनुसार त्यांनी आपले जीवन लखलखणाऱ्या हिऱ्याप्रमाणे विशुद्ध बनविले. २४ जून १९६५ रोजी त्यांनी आपला देह ठेवला, म्हणून त्यांच्या प्रेरक स्मृतिनिमित्त मुखपृष्ठाची योजना केली आहे. तसेच शेवटचे पृष्ठ, योगी जीवनातील स्थिती दर्शविते. देह व देहाशी संबंधित सर्व गोष्टी बुद्धीने विसरून एका निराकाराशी बुद्धियोग साधणे हाच राजयोग आहे. राजयोगाद्वारे तन–मनाचे स्वास्थ्य प्राप्त होते. जगभरात योग दिवसही याच महिन्यात साजरा केला जातो त्यानिमित्ताने मलपृष्ठयोजना आहे.

– प्रकाशक अमृतकुंभ

१) मम्मा – एक प्रेरणास्रोत (संपादकीय) २
२) 'बडी दीदी' मनमोहिनीजींच्या अविस्मरणीय आठवणी ४
३) जीवनात योग सहज व स्वाभाविक कसा होईल? ५
४) मम्मा– 'एक चालतं बोलतं विद्यापीठ' ! ७
५) अशरीरी अवस्था अर्थात् सर्वोत्तम अवस्था ९
६) सद्गुरुवारचा प्रसाद १२
७) मातेश्वरी जगदंबा – सचित्र जीवनपट १३
८) मातेश्वरींचे सोज्वळ जीवन १७
९) शांतीच्या दिव्य पारसमणी, शांतीच्या देवी : दादी शांतामणी २०
१०) वाचक व लेखकांना नम्र आवाहन २३
११) हिरेतुल्य संगमयुगात श्रीमतानुसार सर्वश्रेष्ठ आचारण करु या! २४
१२) अविनाशी रुद्र गीता ज्ञान यज्ञाचा परिचय, उद्दिष्ट व प्राप्ती २८

फोटो, लेख आदी पाठविण्याचा पत्ता :
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

वर्गणी पाठविण्याचा पत्ता :
बी.के. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के. गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंटस्, २२ ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) – ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) – ४००६०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक ब्र. कु. सचिन उपाध्ये.

वार्षिक वर्गणी रु. ७५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,४००/–

E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या – www.amrutkumbh.com.

(संपादकीय)

मम्मा – एक प्रेरणास्रोत

भारताच्या दक्षिण भागांत विशेषतः केरळमधे एक प्रथा आहे.लहान मूल सात–आठ वर्षांचे झाल्यावर त्याला शाळेत दाखल करण्यापूर्वी देवीच्या देवळांत नेतात. तिथे मधाच्या साह्याने जिभेवर 'श्रीः' काढतात. निदान 'श्री' सारखे अक्षर गिरवतात व त्यानंतर शाळेत दाखल करतात. मुंबईसारख्या शहरातील पालकदेखील एकदा तरी मुलाला तिथे नेऊन आणतात. काळानुरुप ह्यात बदल घडला. हल्ली मुलाला, तिथल्या देवळांत थोडासा अभ्यास करावयास बसवतात. एकदा हा विधी पार पडला की मुलाच्या बुद्धीत लक्षणीय फरक पडतो असा अनेक पालकांचा अनुभव आहे. कदाचित् ही भावना असेल; पण अनुभव नाकारता येत नाही. सरस्वतीदेवीचा हा महिमा मानला जातो. सन्याशांमध्येही ज्याची बुद्धी तीक्ष्ण असेल त्याला सरस्वतीची उपाधि प्रदान केली जाते. उदाहरणादाखल महर्षि दयानंद सरस्वतींचे नाव घेता येईल.

सरस्वतीला हंसवाहिनी किंवा मोरावर आरुढ दाखविले जाते. याकारणास्तव अनेक जण शालेय काळांत मोराचे पीस पुस्तकांत किंवा वहीत ठेवत असत. अशा सरस्वतीचे प्रत्यक्ष स्वरूप मम्मा अर्थात् ॐ राधेच्या रूपांत पाहायला मिळाले. सिंध हैदराबादेतील ॐ मंडळी या सत्संगात १९३७ च्या सुरुवातीच्या काळांत राधा नावाची एक कन्या दाखल झाली. बालपणापासून तिला संगीताची उत्तम जाण होती, मधुर कण्ठ लाभला होता. वडीलधाऱ्यांनी सांगितलेले ऐकायचे हा मूळ स्वभाव होता. ब्रह्माबांबांच्याद्वारे शिवपरमात्म्याचे सुरू झालेले कार्य मम्मांच्या कुशाग्र बुद्धीने त्वरीत जाणले. त्यानुसार अतिशय कमी काळांत स्वतःच्या जीवनांत बदल घडविले. परिणामतः मम्मा एक प्रगल्भ व्यक्ती म्हणून सर्वांना अनुभवास येऊ लागली.

ज्यांनी मम्मांच्या प्रत्यक्ष सहवासाचा अनुभव घेतला त्या सर्वांनी मम्मांच्या व्यक्तिमत्त्वांतील काही ठळक बाबींचा उल्लेख आवर्जून केला. त्यांच्या अनेक गुणवैशिष्ट्यांपैकी काहींचे वेचे पाहू.

मम्मा गांभीर्याची जणू मूर्त होत्या –

गांभीर्य याचा अर्थ सर्वसाधारणपणे इंग्रजीतल्या 'सिरियस' शब्दाप्रमाणे घेतला तर ते चुकीचे ठरेल. ज्याची मन–बुद्धी स्थिर झाली आहे तो गांभीर्य धारण करतो व गंभीर होतो असे म्हटले तर योग्य होईल. कुणाच्या आजाराची वा मृत्यूची बातमी ऐकून सामान्य माणसाची जी अवस्था होते ती गंभीर अवस्था इथे अभिप्रेत नाही. मम्मांचे गांभीर्य हे कर्तव्यनिष्ठ व भरलेल्या घडाप्रमाणे होते. शिवबाबांची महावाक्ये ऐकताना मम्मा इतक्या तल्लीन होत असत, जणू सर्व अवयवांचेच कान झाले आहेत, असे तटस्थपणे कुणी पाहिले तर त्याला जाणवे, मम्मा त्या वचनामृतांच्या रसांत न्हाऊन निघत आहेत. अशी एकाग्रता साधल्यावर मनुष्याची जी अवस्था असते त्याला गांभीर्य म्हणता येईल.

शिवबाबांनी जे जे सांगितले ते जसंच्या तसं धारण करण्यात मम्मा अग्रेसर होत्या. अनेकदा साकार मुरलींत बाबा सांगतात तुम्ही एकांतात जाऊन योग करा. घराच्या गच्चीवर जाऊन योग करा...

ज्या दिवशी जे सांगितलं जाई त्यादिवशीच ती गोष्ट धारण करण्यात

मम्मा सर्वप्रथम असत. शिवबाबा सांगत, तुम्ही चांदण्या रात्रीही योग करु शकता! अशा सूचक वाक्यातूनही अर्थ वेचून, मम्मा ती आज्ञा आचरणात आणत असत. हा आहे गाभीर्याचा व्यापक अर्थ.

दिव्य बुद्धिधारक मम्मा –

साकार बाबांच्याद्वारे महावाक्य उच्चारण करणारा साक्षात् परमात्मा शिव आहे याचं स्मरण सदैव मम्मांना असे. त्यामुळे जे सांगितलं आहे ते जसंच्या तसं करण्यावर मम्मांचा भर असे. डेहराडूनच्या प्रेमदीदींनी सांगितलेला प्रसंग अत्यंत बोधप्रद आहे.

त्याकाळांत काथ्याने विणलेल्या बाज किंवा पलंग असत. एकदा असे झाले – साकार बाबांनी कुणा एका–दोघांना बाज एका खाली एक सरकवायला सांगितल्या. त्याप्रसंगी प्रेमदीदी पटकन् म्हणाल्या, ''बाबा, त्या एकाखाली एक जाणार नाहीत''. बाबांनी फक्त प्रेमळ दृष्टीने तिच्याकडे पाहिले मात्र. मम्मांना हा प्रसंग कळल्यावर त्यांनी प्रेमदीदीना म्हटले, तू तर बाबांपेक्षाही हुशार झालीस पण हे बोलताना मम्मांच्या वाणींत माधुर्य व हृदयांत कल्याणकारी भाव होता. तो जाणवल्यामुळेच प्रेमदीदींनी मम्मांना विचारलं, माझी नक्की काय चूक झाली? एकाखाली एक बाज जाणार नाही, हे मला दिसत होतं. तेच मी शब्दांत व्यक्त केलं. त्यावर मम्मांनी दिलेलं उत्तर मार्मिक होते. जो सर्वोच्च बुद्धीचा दाता आहे त्याला ही गोष्ट जाणवली नसेल का? प्रेम, तुला जर बुद्धीत दिव्यत्व आणायचे असेल तर बाबांनी जसं सांगितलंय तसंच्या तसं करण्याचा फक्त प्रयत्न कर. परमेश्वरासमोर आपली बुद्धी न चालवणे हाच पुरुषार्थ आहे . ''रथाचे चाक जमिनीत रुतल्यावर कर्णाची बुद्धी चालेनाशी झाली हे झाले गुरु आज्ञाभंगाचे फलित !''

निर्भय मम्मा –

देवी जगदंबेचे रुप व्याघ्रासीन दाखविले जाते. मम्मा निर्भयतेचे परिपूर्ण रुप धारण करणाऱ्या महान तपस्विनी होत्या. ॐ मंडली संस्थेच्या सुरूवातीच्या काळांत जनप्रक्षोभाचा डोंब उसळला होता हे सर्वज्ञात आहे. आज आपण त्याची केवळ कल्पनाच करु शकतो– १९३७–३८ च्या काळांत एका सतरा–अठरा वर्षाच्या मुलीला कोर्टात उभे रहायचा प्रसंग येतो. न्यायाधीशाने विचारलेल्या सर्व प्रश्नांची निर्भीडपणे मम्मांनी उत्तरे दिली. इतकंच नव्हे तर मम्मांच्या स्पष्ट आणि नम्र उत्तरांमुळे न्यायाधीशही निरुत्तर झाले. खटल्याचा निकाल अर्थात्च ॐ मंडली सत्संगाच्या बाजूने लागला हे वेगळे सांगणे न लगे.

वरील एका परिच्छेदांत उल्लेख केल्याप्रमाणे, एकांतात जाऊन साधना करा. या महावाक्याचे तंतोतंत पालन मम्मा करीत असत. अनेकदा निबिड अरण्यांत जाऊन मम्मा योग करत असत. आबूच्या अरण्यांत आजही अस्वलांच्या हल्ल्याने माणसांनी प्राण गमावल्याच्या बातम्या वाचावयास मिळतात. त्यावरून १९६५ च्या आधी आबूच्या अरण्यांत काय परिस्थिती असेल ह्याची आपण कल्पना करू शकतो. हे सर्व पाहतां त्यांनी खरोखरच जगदंबेची स्थिती गाठली होती हे दिसून येते.

कर्मकुशल मम्मा –

गीतेमधे योग्याचे वर्णन कर्मकुशल असे केले आहे. मम्मांच्या चरित्रांत ठायी ठायी या गुणाचा अंतर्भाव दिसून येतो. आबूच्या ज्ञानामृत प्रिंटींग प्रेसचे आत्मप्रकाशभाई सांगतात – मम्मा प्रत्येक कर्मात अचूक असत. एकदा असं झालं– चहाच्या कपमधे घातलेली साखर ढवळताना आत्मप्रकाशभाईंच्या हातून चमचा आपटण्याचा टण् टण् आवाज येत होता. मम्मांनी फक्त नजरेने हळूच सूचित केले– देवता बनण्याचा मार्ग ज्याने निवडला आहे तो छोट्याशा कर्मातही अशी चूक होऊ देणार नाही.

मम्मा नेहमी खडावा वापरत; पण निर्मलशांता दादी वर्णन करतात, कधीही मम्मांच्या चालण्याचा आवाज येत नसे. जणूकाही एखादी वाऱ्यांची झुळूक आपल्या बाजूने जावी तद्वत मम्मांचे वावरणे असे. निजून उठल्यावर सकाळी मम्मांच्या अंथरुणावर चुणीदेखील दिसत नसे. जणू अंथरुणावर रात्रभर फुले ठेवावीत व सकाळी जाऊन पहावे तर काय ! अशी स्थिती असे.

(पान क्र. ८ वर)

'बडी दीदी' मनमोहिनीजींच्या अविस्मरणीय आठवणी

राजयोगिनी ब्र. कु. गोदावरी दीदी, प्रकाशिका, अमृतकुंभ

ईश्वरी ज्ञानयज्ञात मनमोहिनी दीदींना प्रेमाने 'बडी दीदी' असे म्हटले जाते. आज इतक्या वर्षांनीही त्यांच्याविषयीच्या आठवणी अविस्मरणीय आहेत. बडी दीदींचे लौकिक शारीरिक नाव 'गोपी' होते. एका प्रसिद्ध सिंधी परिवारात त्यांचा जन्म झाला. शिवबाबांवर त्यांचे अतूट प्रेम होते. ईश्वरी ज्ञानप्राप्तीनंतर त्यांना बापदादांकडून 'मनमोहिनी' नाव प्राप्त झाले. आपल्या सान्निध्यात येणाऱ्या प्रत्येकाचा बुद्धियोग त्या शिवबाबांशी जोडत असत.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर १९५० साली ब्रह्माकुमारीज्च्या मुख्यालयाचे स्थान शोधण्यासाठी साकार बाबांनी बडी दीदींनाच पाकिस्तानातून भारतात पाठवले. त्यांनी भारतातील अरवली पर्वताच्या शिखरावरील माऊंट आबू हे स्थान सुनिश्चित केले. १९५२ मध्ये ईश्वरी सेवेचा आरंभ झाला, त्यावेळी त्यांनी आपल्या त्याग-तपस्येच्या बळावर दिल्ली, अलाहाबाद आदि स्थानांवर ईश्वरी सेवाकेंद्रे उघडली व ईश्वरी सेवा केली. १९६५ साली मातेश्वरी जगदंबा (मम्मा) अव्यक्त झाल्यावर साकार बाबांच्या समवेत मधुबनमध्ये राहून यज्ञातील अंतर्गत कार्यभार सांभाळण्यासाठी निमित्त बनल्या. साकार बाबा, अव्यक्त झाल्यावर १९६९ पासून प्रकाशमणी दादींबरोबर यज्ञाची (संस्थेची) जबाबदारी सांभाळली. समस्त ब्राह्मण परिवाराचे प्रेमाने संगोपन करून संपूर्ण विश्वात ईश्वरी सेवेचा विस्तार केला. त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये व गुण अनेकांना प्रेरणा देत असत. मलाही त्यांच्या सान्निध्यात राहण्याचं भाग्य लाभलं आणि बऱ्याच गोष्टी शिकायला मिळाल्या. ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या, बडी दीदी सर्वोत्तम विद्यार्थिनी होत्या. त्या सदैव ईशचिंतनात मग्न असत. तसेच इतर बंधु-भगिनींनाही सहजयोग, कर्मयोग व राजयोगाचा अभ्यास करवित असत. ईश्वरी महावाक्यांवरील त्यांच्या निस्सीम प्रेमामुळे त्या 'मुरली'तले प्रश्न काढीत. दिवसभरांत त्यांना भेटायला येणाऱ्यांना त्याची उत्तरं सांगून उल्हसित करत.

सर्वांना ईश्वरी अलौकिक प्रेमाचा त्या अनुभव करवित असल्याने, कोणाचेही चित्त बहिर्मुखी होत नसे. याकारणाने कुणाचीही बुद्धी कलियुगी सृष्टीतील व्यक्ती, वस्तू आणि वैभवांत अडकत नसे. दीदी, गंभीर, अंतर्मुखी, रमणीक, निर्भय व निश्चिंत असत. प्रामाणिक व निर्मळ अंतःकरणाच्या त्या प्रतिमूर्तीच होत्या. यज्ञरक्षक व अथक सेवाधारी होत्या. कोणालाही अन्नदोष व संगदोषाची बाधा होऊ नये यासाठी त्या नेहमीच सतर्क असायच्या. पवित्रतेचे व्रत अखंड टिकविण्यासाठी, त्या अनेकांना सावध करत. ब्रह्मचर्याबरोबरच ब्रह्माचारी बनवित. त्या सर्व सेवांमध्ये अग्रणी (ऑल राऊंडर), बिनचूक (ॲक्युरेट) व नियोजनबद्ध होत्या. प्रत्येक कार्यात सतर्क (अलर्ट) होत्या. दीदी स्वतः आत्मसन्मानांत (स्वमानामध्ये) राहून दुसऱ्यालाही उचित मान देत असत.

बडी दीदी संपूर्ण परिवारासाठी खरोखरच एक आदर्श होत्या. त्यांची दृष्टी व त्यांचा दृष्टिकोन कधीही सीमित नसे. त्यामुळे त्या सर्वांना देवदूताप्रमाणे दीपस्तंभ ('लाइट हाऊस व माइट हाउस') भासत. आता परमधामास जाण्याची वेळ आली आहे असं निर्मोही व साक्षी द्रष्टा बनून म्हणत असत.

(पान क्र. ११ वर)

जीवनात योग सहज व स्वाभाविक कसा होईल?

(२१ जून – आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त)

राजयोगी ब्र. कु. जगदीशभाई

साकार ब्रह्माबाबांच्या वेळची गोष्ट आहे. एकदा कानपुर किंवा लखनऊ येथून काही मंडळी आली होती. बाबा आसनमांडी घालून अगदी सरळ बसले होते. त्यांचा योग अतिशय स्वाभाविक होता. लाल दिवा लागला, योगाचे विशेष गीत वाजवले म्हणजेच चांगला योग लागेल असे नव्हते. चेहऱ्यावर दिव्य प्रभा विलसत होती. वय जास्त असलं तरी बाबांचं शरीर अतिशय लवचीक होतं. ते योग करत होते आणि आम्ही त्यांच्या समोर बसलो होतो. शिवबाबांशी त्यांचा योग इतका शक्तिशाली होता की जणू नेत्रांमधून ज्वाला निघत असल्याचं वाटावं. त्यादिवशी बाबा मधूनच पाय हलवत आणि पुन्हा शांत, स्थिर होत होते. आलेल्या मंडळींमधे एक प्राध्यापक होते. त्यांना या गोष्टीचं आश्चर्य वाटलं, कारण हठयोगात शरीर स्थिर करून ध्यान लावतात. त्यांनी मला हा प्रश्न विचारला. याचं उत्तर होतं– गीतेत वर्णन केलेला 'कर्मयोग' बाबांनी प्रत्यक्ष आयुष्यात सहजपणे अंगीकारला होता. आपण अनेकदा मनांत ज्ञानबिंदूंची उजळणी करतो व त्या स्मृतिस्वरूपात स्थिर राहण्याचा प्रयत्न करतो. मात्र नेहमीच हे शक्य होते असे नाही. 'मी ज्योतिर्बिंदू आत्मा आहे. परमधामातून आलो आहे. मी आत्मा एक दिव्य प्रकाश, शक्तिस्वरूप आहे' ब्रह्माबाबांची स्मृती कर्म करतानाही अशी पक्की असे.

योगी व्यक्तीची दृष्टी स्थिर असते :

जगांत अनेक प्रकारे योगाभ्यास केला जातो. 'त्राटक' या प्रकारात साधक, एका बिंदूवर दृष्टी स्थिर करतात. एक मोठं वर्तुळ आखून त्याच्या आंत आणखी एक वर्तुळ, त्यात अजून छोटं वर्तुळ, असं करत शेवटी आंत एक बिंदू काढतात. प्रथम बाहेरच्या सर्वात मोठ्या वर्तुळावर नेत्र स्थिर करा. मग त्याच्या आतील वर्तुळ पाहताना, पहिलं वर्तुळ विसरून त्यावरच त्राटक करा. मग तेही न पाहता तिसऱ्या वर्तुळावर एकाग्र व्हा. असं करतां करतां शेवटी बिंदूवर त्राटक करून एकाग्रता साधली जाते. तिथे प्रथम शरीर स्थिर करून मग हळूहळू मनाला स्थिर केलं जातं. आता परमात्मा पित्याकडून सत्य ज्ञान प्राप्त झाल्यावर या सगळ्याचा आध्यात्मिक अर्थ स्पष्ट होतो. आपला हा अलौकिक पुनर्जन्म आहे. सर्वात मोठं आखलेलं वर्तुळ म्हणजे हे अफाट विश्व. त्यानंतर आपला देश, समाज, कुटंब नातेवाईक, माझं शरीर अशी एकात एक अनेक वर्तुळं आहेत. प्रत्येकाचा खूप मोठा विस्तार आहे. या वर्तुळांच्या मध्यभागी 'मी' ज्योतिर्बिंदू 'आत्मा' आहे. एकेका वर्तुळाला विसरण्याची मेहनत करत अखेर निजस्वरूपावर मन बुद्धीने एकाग्र होणं, यात किती शक्ती वाया जाते, म्हणूनच विस्तार असूनही ज्या गोष्टींशी आपला संबंध नाही, त्या पाहूनही न पाहण्याचा अभ्यास खरा योगी करत असतो. उत्तम एकाग्रता साधल्यामुळे त्याची दृष्टी कायम स्थिर असते.

योगी जीवन स्वाभाविक जीवन:

अनेकदा भक्तिमार्गातील सत्संगात प्रवचन ऐकून 'सत्य वचन महाराज' म्हणून लोकं माना डोलावतात. मात्र सत्संग संपल्यावर पुन्हा प्रापंचिक गप्पा, माझं–तुझं, गाऱ्हाणी सुरू होतात. आपणही योग भट्ठी करतो. बरेचजण पहाटे अमृतवेळेला दोन अडीच वाजता उठून योग करतात. पाहिलं तर वाटावं

योगात किती स्थिर आहेत! परंतु थोडासा आवाज झाला, छोटीशी गोष्ट घडली, तरी काहींना चटकन राग येतो. तो व्यक्तही होतो. ज्याप्रामाणे आजारी पडल्यावर ब्लड टेस्ट केली जाते, त्याप्रामाणे अनेक मार्गांनी आपल्या योगाच्या स्थितीची परीक्षा होत असते. नाजूक स्वभावामुळे अनेकजण वर्षानुवर्ष मनांत वैरभावना धरून ठेवतात. इतके चांगले योगीजन असं का करतात कारण त्यांचा योग सहज (नॅचरल) नसतो. अशा व्यक्ती जेव्हा करायचा तेव्हा कसून योगाभ्यास करतात आणि नाही तर एकदम सगळं सोडून देतात, असं कधीही करू नका. आपल्याला हळूहळू स्वत:ची संपूर्ण स्थिती गाठायची आहे हे लक्षात ठेवा. याद्वारे आपलं श्रेष्ठ भविष्य घडेल. श्रेष्ठ स्थिती गाठण्याची मेहनत सत्ययुगांत करणार की संगमयुगांत? संगमयुगात केलेल्या पुरुषार्थाचं फळ तिथे मिळतं, म्हणूनच सहजयोगी आयुष्य जगा.

योगी नेहमी दुसऱ्याचं भलं चिंततो :

'योग' शब्दाचा अर्थ होतो जोडणे. इंग्रजीत 'टू प्लस टू इज फोर' तर हिंदीत म्हणतात 'दो और दो का योग चार'। म्हणजेच कोणत्याही दोन गोष्टी जोडल्यावर काहीतरी परिणाम दिसतो. जोडणे म्हणजे योग आणि योग म्हणजेच जोडणे. चहूबाजूंना धावणारे मनांतले विचार आवरून एक परमात्म्याशी संबंध जोडावा, हाच खरा योग आहे. आपला योग लागतो किंवा नाही हे आपण मनांत धरून ठेवलेल्या अनेक गोष्टींवर अवलंबून असते. वैज्ञानिक जसे सागराच्या तळाशी जातात, तसेच अंतराळात यान पाठवून अथांग अवकाशाचा वेध घेत असतात. त्याप्रामाणे मनातील विचारांची खोली तसेच उंच घेतलेली भरारी दोन्ही जाणून घेणं आवश्यक आहे. जेव्हा मनाची अवस्था श्रेष्ठ असते तेव्हा त्यागाचे, परोपकाराचे, दानी-वरदानी बनून इतरांचं भलं करण्याचे विचार येतात. मनाने चांगली असलेली व्यक्ती 'सर्वांचं आयुष्य निरोगी, समृद्ध, सुखी व्हावं' असाच विचार करते. मात्र जेव्हा मनांत उलट सुलट विचारांची आवर्तनं फिरत राहतात तेव्हा विचारांची पातळी खालावते. आपल्या वागण्या-बोलण्याने इतरांना दु:ख देणं, कोणत्याही मार्गाचा अवलंब करून स्वत:चा स्वार्थ साधणं असे विचार माणसाला दुर्जन बनवतात. विचार करा, बाबांनी आपल्याला किती श्रेष्ठ संकल्प (स्वमान) शिकवले आहेत. तो परमात्मा सर्व गुणांचा सागर, सर्वशक्तिवान आहे. आपण त्याची अविनाशी लेकरं आहोत. तेव्हा त्यासम गुणवान, शक्तीशाली नक्की बनू. परंतु यासाठी हवा तीव्र पुरुषार्थ.

दैहिक नाती विसरून निराकाराशी नातं जोडा :

देवाची भक्ती करताना अनेक अभंगांमधे, गीतांमधे मनाला परमात्म्याशी जोडण्याविषयी सांगितलं जातं. पण खरंच सर्व संबंधांचं नातं त्याच्याशी जोडलं जातं का? विचार करण्यासारखी गोष्ट आहे. परमात्म ज्ञान प्राप्त केलेल्या कित्येक व्यक्तीही दैहिक नात्यांमधे अडकलेल्या दिसतात. कुणी विचारलं नसेल तरीही अभिमानाने आपल्या मुला-नातवंडांचं कौतुक करत असतात. ही देहाची नाती तर या जन्मापुरती आहेत. प्रत्येक मनुष्यात्म्याची वैश्विक नाटकांत भूमिका आहे. भूमिका बदलली की सारं संपलं। बाबांनी आत्म्याचा परिचय देऊन देह आणि दैहिक संबंधांच्या बंधनातून बुद्धी काढून घेण्याचा सोपा मार्ग दाखवला आहे. सष्टिचक्राचं ज्ञान काय सांगतं हळूहळू कलियुगाचं महापरिवर्तन होत आहे. आजची संपत्ती, मोठमोठी घरं, दिखाव्याचं मायवी जग एक दिवस नष्ट होणार आहे. इतकी समज येऊनही माणसाची लालसा, मानमरातब मिरवण्याची इच्छा काही सुटत नाही. स्वत:ला ज्ञानी तू आत्मा समजणारेही हा मोह समजू शकत नाहीत. जोपर्यंत सर्व संबंध एक शिवबाबांशी जोडत नाही, तोपर्यंत योग लागणं अशक्य आहे. म्हणूनच खरा योगी अंतर्मुखी होऊन असा पुरुषार्थ निरंतर करत असतो.

इच्छा कमी तर मन शांत:

शिव परमात्मा अति सूक्ष्म ज्योतिर्बिंदू आहे. मनाची एकाग्रता साधली तरच 'मन्मनाभव' स्थिती होते. पण सगळ्यांचा असा सहज योग लागत नाही. एकतर एकाग्रता कमी पडते. तसंच मनांत काही ना काही इच्छा असतात.

(पान क्र. २७ वर)

मम्मा– 'एक चालतं बोलतं विद्यापीठ' !

ब्र. कु. रेखा, ठाणे (पश्चिम)

२४ जून जसाजसा जवळ येऊ लागतो तसतसे मम्मांनी केलेला त्याग व तपस्येच्या स्मृती ताज्या होऊ लागतात. मम्मा, साक्षात् प्रेम,शांती, करुणा याची मूर्त होत्या. साकारबाबांनी त्यांच्यामधील अनेक गुणांमुळेच सर्व ईश्वरी कार्यभार त्यांच्याकडे सोपवला. 'दिनांक १७ फेब्रु,१९३८ हा यज्ञ इतिहासातील सर्वात महत्वाचा दिवस.' ह्या दिवशी बाबांनी स्वतःकडील सर्व संपत्तीच्या विनियोगाकरिता विश्वस्त मंडळ बनवले व ते सांभाळण्याची जबाबदारी मम्मांकडे दिली..! मम्मा वयाने जरी लहान असल्या तरी त्यांच्याकडे असलेली ज्ञानाची समज, वादातीत होती. त्यांच्याकडे उत्तम प्रशासनकौशल्य होते. मम्मांनी आईसारखे सर्व ब्रह्मावत्सांचे अलौकिक भरणपोषण केले. त्या खऱ्या अर्थाने सर्वांच्या 'मम्मा' होत्या. खुद्द त्यांची लौकिक जन्मदात्रीसुद्धा त्यांना मम्मा म्हणू लागली, इतका त्यांच्यामधील मातृत्वाचा संस्कार प्रकर्षाने प्रकट झाला होता. असं उदाहरण इतर कुठल्याही सत्संगात पाहायला मिळणे कठीण आहे.

मम्मांचे लौकिक जीवनातील नाव 'राधा' होतं. शाळेमधे 'राधा' एक हुशार विद्यार्थिनी म्हणून प्रसिद्ध होती. त्यांनी अभ्यासांत जसा प्रथम क्रमांक सोडला नाही तसंच सतार वाजवण्यातसुद्धा त्या तरबेज होत्या. त्यांचा आवाज मधुर होता. हे वैशिष्ट्य बाबांनी हेरले व त्यांना ईश्वरी गाण्यांना चाली लावण्यास सांगितलं. मम्मांनी तात्काळ होकार दिला. बाबा त्यांना नवनवीन काव्यपंक्ती देत व मम्मा त्यांना चाल देऊन गात असत. ह्यात मम्मांचा आज्ञापालनाचा व आदर्श विद्यार्थिनीचा गुण दिसून येतो. यज्ञसेवेतील कुठल्याही कार्याला मम्मांनी कधी नकार दिला नाही. त्यांच्या तात्काळ आज्ञापालनाच्या गुणामुळे त्यांच्यातील इतर सुप्त गुण विकसित होत गेले. मम्मा म्हणायच्या– कधीही ब्रह्माबाबांच्या बाह्यस्वरूपाकडे बघून, बाबांना सर्वसामान्य समजण्याची चूक करू नका. त्याकाळात 'बापदादा' हा शब्द प्रचलित नव्हता. सर्व यज्ञवत्स ऑलमाइटी बाबा म्हणजे शिवबाबा व साकार बाबा असा उल्लेख करत. बाबांनी कधीही काहीही सांगितले तर त्यांना नाही म्हणू नका असं मम्मांचं सांगणं असायचं. बाबा जेव्हा आपल्याला एखादे कार्य सांगतात, तेव्हा ते कार्य करण्याची क्षमता व आवश्यक असलेले गुणही वरदानाच्या रुपात आपल्यामधे भरतात असे अनुभवसिद्ध बोल मम्मांचे असत.

ज्यांना मम्मांचा सहवास लाभला ते ब्रह्मावत्स स्वतःला खरंच धन्य समजतात. चंद्रमणीदादींनी आपल्या वडलांची साकारबाबांशी प्रथम भेट घडवून आणली तेव्हा बाबांनी त्यांना मम्मांकडे जाण्यास सांगितलं. मम्मांकडे गेल्यावर त्यांना मम्मांच्या जागी श्रीलक्ष्मीचा साक्षात्कार झाला. दादींचे वडील श्रीलक्ष्मीचे निस्सीम भक्त असल्याकारणाने साक्षात्काराने अतिशय भारावून गेले व स्वतःला काया–वाचा–मनाने ईश्वरी कार्यास वाहून घेतले.

गांधीनगर सेवाकेंद्रामधील कैलाश दीदी मम्मांच्या सहवासाबद्दल सांगतात–

मम्मांना पत्रांत एकदा लिहिलं– मी तर अशिक्षित आहे, मला जग रहाटीचा अनुभवसुद्धा अजिबात नाही,

तरीही बाबांच्या सेवेमधे माझे आयुष्य समर्पित करण्यासाठी मी काय करु? कुठल्या गोष्टींची दक्षता बाळगू? कैलाशदीदींनी त्या पत्रोत्तराचा सारांश एका बहिणीकडून समजावून घेतला. मम्मांनी अतिशय प्रेमळ शब्दांत काही सूचना केल्या होत्या. बेटा, एक लक्षात ठेव बाबांचं घर हेच माझं कायमस्वरुपी घर आहे ह्या घराव्यतिरिक्त अन्य कुठलंही घर हे माझं नाही. तसेच बाबा-मम्मा व दैवी परिवाराव्यतिरिक्त अन्य कोणताही परिवार माझा नाही व शेवटची अतिशय महत्वाची गोष्ट म्हणजे ईश्वरी सेवेनिमित्त अनेक सेवाकेंद्रांवर जाण्याचा योग येतो तेव्हा एका केंद्रावरील बातम्या दुसऱ्या केंद्रात कधीही पसरवू नकोस. सर्वांशी स्वभाव जुळवून घे व त्यांच्याशी मिळून-मिसळून रहा. त्या दिवसापासून कैलाशदीदींनी तसे आचरण ठेवले व त्या म्हणतात, हे आचरण्याकरिता मला मेहनत लागली नाही. त्या दिवसापासून मम्मांचं जणू मला वरदानच मिळालं.

बोलण्या-चालण्यासकट सर्वच बाबतीत मम्मा अतिशय अचूक व काटेकोर होत्या-एकदा एक बहीण सांगू लागली, मम्मा आज मी बाबांना बॅडमिन्टनमधे पराभूत केलं. मम्मांनी लगेच तिचं म्हणणं दुरुस्त केलं, बेटा तू खेळ जिंकलीस; पण बाबांना तू (तपस्येमधे) जिंकू शकणार नाहीस !

कोणी उच्च स्वरात बोलत असेल तर मम्मा त्यांना समजावत असत- तुम्ही आश्रमात आला आहात. इथे धीम्या स्वरांत मधुर व कमी शब्दांत बोलावं. मनोहरदादी म्हणतात, मम्मा खडावा वापरत असत; पण त्यांच्या पावलांचा आवाज तर येत नसे. आपल्या जवळून गेल्या तरी समजत नसे, देवदूताप्रमाणे जात असत. मनोहरदादींनी याविषयीची खरी गंमत पुढे सांगितली. नकळत दादीही मम्मांचे अनुकरण करू लागल्या; पण त्या प्रयत्नांत त्यांचे लक्ष खडावांकडे अधिक जाऊ लागले. त्यावर मम्मांनी दादीनां कर्मभानांत न येण्याची सहजसुंदर शिकवण दिली. मम्मांचं हसणंसुद्धा मंदिरातील देवतेच्या मूर्तीप्रमाणे स्मितहास्य असे. खळखळून हसण्यातसुद्धा विकारांचा अंश आहे हे त्यांना सदैव स्मरणांत असे.

कुंजदादी आपल्या अनुभवात असं सांगतात- यज्ञसेवेत मिळून-मिसळून प्रत्येक कार्य करण्याची प्रथा सुरूवातीपासूनच होती. कामांत ढिसाळ व्यक्ती मला नको असे मी एकदा मम्मांना सांगितले. त्यावर मम्मा म्हणाल्या, हे बघ, प्रत्येकामधेच काही उणंदुणं असतंच आणि मला आईच्या नात्याने सर्वांचं भाग्य बनवायचं आहे. सर्वांनीच एखाद्याला नाकारलं तर कसं चालेल? एखाद्यामधे काही उणिवा असतील तर तुमच्याबरोबर राहून ती हळूहळू शिकत जाईल. ''मम्मांनी कुठल्याही व्यक्तीला कधीही नाकारलं नाही. एखाद्याच्या अवगुणी स्वभावाला त्यांनी दैवी गुणांत परिवर्तन करण्यात सहकार्य केलं''.

यज्ञवत्सांना त्या सदैव बाबांशी जोडत असत - कुठल्याही व्यक्तीला मम्मांनी कधीही स्वतःमधे गुंतवलं नाही, तसेच स्वतःसुद्धा इतर देहधारींत गुंतल्या नाहीत. मम्मा म्हणायच्या, मैं तो शिव पर बलि चढ़ी हूँ तुम भी उसी एक का अनुसरण करो और उसी को याद करो। असे जीवन व्यतित करणाऱ्या मम्मा-अपर्णा, पार्वती, जगदंबा अशा देवींच्या दिव्यत्वाचा समुच्चय होत्या.

***

(पान क्र. ३ वरून)

शिवबाबांनी उच्चारलेल्या महावाक्यांना लिखितरूप दिल्यावर ते तपासण्याचे दायित्व मम्मांकडे सोपविले जाई. मम्मा स्मृतिधर असल्याने अनवधानाने राहिलेली वाक्यें अचूक सांगत. वाक्यरचना, ऱ्हस्व-दीर्घ अशा अनेक बाबींत काटेकोरपणे दुरुस्त्या वा बदल करण्याची जबाबदारी त्या निभावित असत.

अशा अनेक गुणांची खाण असलेल्या मम्मांच्या चरित्रातून आपल्यासारख्या साधकांनी प्रेरणा घ्यावी तितकी कमीच आहे.

***



अशरीरी अवस्था अर्थात् सर्वोत्तम अवस्था

(मातेश्वरी जगदंबा यांच्या ओजस्वी वाणीतील एक प्रवचन भावानुवाद रूपांत येथे देत आहोत. सर्व राजयोगी अभ्यासकांना हा लेख उपयुक्त ठरेल ही शुभ इच्छा.)

आत्म्याचे मूळ स्वरूप आहे अशरीरी , ह्याचेच दुसरे नाव निराकारी. आत्मा मुळात अशरीरी असतो आणि नंतर शरीर धारण करतो. अशरीरी अवस्थेचा अनुभव हेच तर आपले उद्दिष्ट आहे. ह्या सर्व गोष्टी सांगताना सहज वाटतात; सहजपणे सांगितल्या जातातही. परंतु अशरीरी अवस्थेत राहण्याचा अभ्यास कोणालाही नसतो. जसे शिवबाबा अशरीरी आहेत तसे आपण सर्व आत्मेसुद्धा अशरीरी अवस्थेत परमधामात बाबांसमवेत असतो. जसे बाबा येतात, ह्या शरीराचा, कर्मेंद्रियांचा उपयोग करतात, पुन्हा लगेच अशरीरी बनतात. हाच अभ्यास आपण सर्वांनी करायचा आहे कारण अशी अशरीरी अवस्थाच सर्वोत्तम अवस्था आहे. कासव जसे शरीराद्वारे काम करते, मग अंग आपल्या कवचात आक्रसून स्तब्ध बसून राहते, तसेच आपल्यालाही कामासाठी हे शरीर वापरायचे आणि काम झाल्यावर आपल्या मूळ अशरीरी अवस्थेत स्थिर व्हायचे असा सराव करायचा आहे. काही कामे मात्र अशी असतात जेव्हा आपल्याला शरीराच्या भानांत (देहभानांत) यावयाची गरजच नसते! आपण जेवढे बाबांच्या आठवणींत त्यांच्याजवळ राहू, तेवढी जास्त शक्ती आपल्याला त्यांच्याकडून मिळत राहते. त्यामुळे ह्या अवस्थेत सतत राहण्याचा पुरुषार्थ आपल्याला करायचा आहे. जसे शिवबाबा ह्या क्षणी शरीरात तर पुढील क्षणी अशरीरी होतात, तसाच अभ्यास आपण सतत केला तर जसे काही आपल्याला अशरीरी होऊन उडण्यासाठी पंखच प्राप्त होतील. जे ज्ञानात अगदी नवीन आहेत त्यांच्यासाठी हे थोडे कठीण वाटेल, परंतु जे जुने आहेत, ज्यांना जाणीव आहे, त्यांनी ह्या अवस्थेचा जास्तीतजास्त सराव करणे आवश्यक आहे.

याद अर्थात् आठवण करण्याचेसुद्धा वेगवेगळे मार्ग आहेत . हलकी अवस्था ही खरेतर एक सहज सोपी आणि मधुर अवस्था आहे. स्थूल कार्य करताना किंवा घरात काम करतानासुद्धा आपण आत्म्याचा मूळ स्वधर्म विसरतो आणि त्यामुळे आपल्याकडून छोटी छोटी विकर्मे होत राहतात. आपण जर अशरीरी अवस्थेचा सतत अभ्यास केला तर ही छोटी विकर्मे आपण सहज टाळू शकतो. मग मायासुद्धा आपल्याला त्रास देऊ शकणार नाही. तेव्हा ही अवस्था हे जणू एक सुरक्षा कवच आहे. जसे शिवबाबा शरीर उसने घेऊन कार्य करतात, तसे मीसुद्धा हे शरीर सेवेसाठी घेतले आहे, ह्या स्मृतीत राहिलो तर पाच विकाररूपी भूतांपासूनही आपण सहज सुरक्षित राहू शकतो, ही गोष्ट सखोल समजून घेणे आवश्यक आहे.

कोणी जर ध्यानांत (साक्षात्काराच्या अवस्थेत) जात असेल तर ध्यानाचा विभाग पूर्ण वेगळा आहे. ध्यान म्हणजे अशरीरी अवस्था मुळीच नाही, ही सूक्ष्म गोष्ट समजून घेणे आवश्यक आहे. यामुळे ध्यानाचे आकर्षण न ठेवता अशरीरी अवस्थेचा आपल्याला सराव करायचा आहे. अशरीरी अवस्थेत प्रिय बाबांजवळ बसून राहणे हे जणू सुरक्षेचे साधन आहे. जसे एखादे लहान मूल कोणलाही घाबरले तर आईच्या कुशीत जाऊन बसते, तसेच काहीसे...!

आपण सर्व नट वा अभिनेते आहोत आणि या रंगभूमीवर आपापली भूमिका बजावत आहोत, हे ज्ञान बाबांनी आपल्याला दिले आहे. एखाद्याचे वर्तन जर योग्य नसेल, तर ती अविनाशी

नाटकातील त्याची भूमिका आहे आणि ती तो योग्य प्रकारे वटवत आहे, त्यामुळे त्यात आपल्याला दुःख किंवा आनंद होण्याचे कारण काय? परंतु यासाठी आपले वर्तन योग्य अर्थात् श्रीमतानुसार जरूर हवे. जेवढे आवश्यक आहे, तेवढ्यापुरते कर्म करताना त्यात लक्ष केंद्रित करावे आणि काम झाल्यावर पुन्हा आपल्या मूळ आत्मिक रूपात स्थित व्हावे आणि बाबांच्या समीप असण्याचा अनुभव करावा. असा अभ्यास जर सतत करीत राहिलो, तर हाच काय, पुढील २१ जन्म वा २५०० वर्षे आपण संपूर्ण सुरक्षित राहूच ! आपले प्रत्येक कर्मसुद्धा श्रेष्ठ आणि चांगलेच होईल. पाच विकारांचा मागमूसही राहणार नाही. आत्म्याचे मूळ शुद्ध स्वभाव-संस्कार जागृत होतील. अशाप्रकारे हा अभ्यास आपल्याला उच्च स्थितीत घेऊन जाणारा आहे. आपण जणू काही या पृथ्वीच्या वर उंच जात आहोत. म्हणतात ना, देवतांचे चरण आताच्या या विकारी सृष्टीला स्पर्शही करीत नाहीत. अर्थात्, ही पृथ्वी तर राहणारच आहे, परंतु सद्यःस्थितीत ती पतित / मलिन झाली आहे, म्हणून बुद्धिरूपी पावलांनी या पृथ्वीला स्पर्शही न करता आपल्याला घरी परतायचे आहे.

आपला सद्गुरू शिवबाबा आहे. सर्वांना पार घेऊन जाणे हे त्या सद्गुरूचे कर्तव्य आहे. सर्वांना स्वच्छ आणि पवित्र करून घेऊन जाणे अर्थात् सर्वांची दुर्दशा दूर करून सद्गती करणे हे विशेष कर्तव्यही त्याचेच! जसे पक्षी आपल्या लहानग्या पिलाला उडायला शिकवतात, तसेच बाबा आपल्याला उंच उडायला शिकवत आहेत. साकारी किंवा आकारी जगापासूनही दूर, निराकारी जगात अशरीरी होऊन स्थित राहणे हीच गोष्ट बाबा शिकवत आहेत. याला म्हणतात बुद्धीची साफसफाई; बुद्धियोग म्हंटले आहे ना! शारीरिक योगासने अनेकजण शिकवतात, परंतु बुद्धीची अर्थात् आत्म्याची स्वच्छता करणे हा पुरुषार्थ करणे आता आवश्यक आहे. एकदा हे करणे जमले, की मग आणखी काही करण्याची गरजच नाही. ह्या वेळी जे दैवी संबंध निर्माण होतात, ते पुढील २१ जन्मासाठी, २५०० वर्षांसाठी असतात. तेव्हा आपल्याला याच वेळी स्वतःची सर्व अशुद्ध कर्मखाती संपुष्टात आणून नवे पवित्र संबंध निर्माण करायचे आहेत हे आपण समजून घेतले पाहिजे.

केवळ कोणाला दुःख न देणे, खोटे न बोलणे, क्रोध न करणे यासाठी प्रयत्न करायचे आहेत असे अनेकांना वाटते. यापुढे जाऊन बाबा असे सांगतात, देह-अभिमानी बनणे अर्थात स्वतःला आत्मा न समजता शरीर समजून व्यवहार करणे, हेही दुःख देणेच आहे. म्हणूनच आत्म-अभिमानी स्थितीत राहणे हा मूलभूत अभ्यास आहे.

देवतांना किती सजवलेल्या रूपात दाखवितात. त्यांच्या मूर्तींची इतकी सजावट करतात, तर प्रत्यक्षात सत्ययुगात त्या किती सुंदर असतील! त्यांचे महाल किती सुशोभित असतील! शिवाय तिथले सौंदर्य नैसर्गिक असेल. त्यांना लिपस्टिक पावडरसारख्या सौंदर्य प्रसाधनांची गरज नसेल. दुधाच्या नद्या असतील म्हणजे काही नद्यांतून दूध नाही वाहणार! दुधाच्या नद्या याचा अर्थ सर्व गोष्टींची मुबलकता, संपन्नता! ही कोणतीही कविकल्पना नाही, कारण हे सर्व ज्ञान प्रत्यक्ष परमात्मा आपल्याला देत आहे. ते कुणा मनुष्याकडे असूच शकत नाही.

तर या सर्व सुखासाठी आणि प्राप्तीसाठीच आपल्याला अशरीरी बनण्याचा पुरुषार्थ करायचा आहे. बाबांनी हा जो महायज्ञ रचला आहे तो साऱ्या कल्पांत सर्वश्रेष्ठ यज्ञ आहे, आणि यात इतर सर्व यज्ञ स्वाहा होतात. चला आपण मायाजीत बनून या यज्ञाला आपल्याकडून आहुती देऊया. विजय हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे. बाबा ज्या विनाशाबद्दल सांगतात, त्याची लक्षणे आपल्यासमोर दिसू लागली आहेत, त्याचवेळी आपण मात्र आपल्या पुरुषार्थाने सतत प्रगतीपथावर राहूया.

अशरीरी शब्द कुठून आला? अशरीरी आत्मा. कारण अनेक जन्म भिन्न भिन्न शरीरात राहिल्यामुळे आत्म्याला आपल्या मूळ अवस्थेचे विस्मरण झाले आहे. म्हणून ही अशरीरी अवस्था पक्की करण्यास बाबा सांगत आहेत. हा मार्ग किती सरळ सोपा आणि

गोड आहे. फक्त अशरीरी बना आणि अशरीरी बाबांजवळ बसून रहा. बस! एवढेच करायचे आहे.

ईश्वराला सर्वव्यापी होण्याची गरजच नाही. जर तो सर्वव्यापी असता, तर मग त्याच्या उपस्थितीतही माणूस दुःखी का झाला असता? ही तर सर्वोच्च परमात्म्याची सर्वाधिक निंदा करणेच नव्हे का? 'बाबा' या शब्दानेच किती अमाप स्नेह हृदयात दाटून येतो... त्याच्याकडून आपल्याला सर्व प्राप्ती होणे हा आपला अधिकारच आहे, फक्त त्यासाठी त्याची आठवण आपल्याला सतत असणे आवश्यक आहे. 'नष्टोमोहः' होणे खरे पाहता तितके कठीण नाही. कठीण आहे ते म्हणजे आपली अनेक जन्मांची विकर्मे योगबलाने भस्म करणे. नष्टोमोहाचे मूर्तिमंत उदाहरण आपल्यासमोर आहे- ब्रह्माबाबा. शिवबाबांनी त्यांच्या शरीरात प्रवेश केला, आणि एका क्षणात सर्वस्व त्याग करून ते नष्टोमोहः झाले. अनेक मातादेखील नष्टोमोहः होऊन यज्ञात सामील झाल्या. त्यावेळी त्यांना आपण आता सत्ययुगात जाणार असल्याचा शुद्ध आत्मिक कैफ (रुहानी नशा) होता.. या जुन्या-पुराण्या जगांत आता काय ठेवलंय? यात रस शोधणे हे जणू कोरडा ऊस चोखणे आहे. म्हणूनच बाबासुद्धा सांगतात- या जगात आस्वाद घेण्यासारखे काही नाही, आता चाखायची ती अविनाशी ज्ञानाची, प्राप्तीची आणि बाबांच्या स्मृतीची, प्रेमाची गोडी ... म्हणजे बाबांच्या भाषेत पौष्टिक खाद्य!

बाबाच आपल्याला हे पौष्टिक खाद्य चाखण्यास योग्य बनवत आहेत, म्हणूनच आपण सदैव त्यांची स्मृती ठेवली पाहिजे. कितीही नास्तिक मनुष्य असो, मनांत अवश्य हे जाणतो की काहीतरी शक्ती आहे. परंतु ती शक्ती किती अलौकिक आहे, हे केवळ आपण सारेच जाणतो. तो या जुन्याचे नव्या जगांत परिवर्तन कसे करतो आहे, हे केवळ आपण जाणले आहे. तर अशा बाबांवर आपले किती प्रेम असावे ! तुकड्या-तुकड्यांमध्ये वाटले गेलेलं प्रेम आता एकत्र करायचे आहे. तो एक बाबाच तर आपला आहे. त्याच्यामुळेच तर आपल्याला केवढी मोठ्या प्रमाणावर प्राप्ती होते! इथे या जुन्या-पुराण्या जगांत होणारे लाभ किती क्षणभंगुर आहेत. तेव्हा खराखुरा लाभ घेण्यासाठी फक्त बाबांचे होऊन राहायचे आहे. परमात्मा पिता आहे हे गायन सारेच करतात, परंतु आता हाच परमात्मा माझा खऱ्या अर्थाने प्रत्यक्ष पिता झाला आहे. इतका सर्वशक्तिमान असूनही किती सर्वसाधारण रूप धारण करून त्याचे कर्तव्य करतो आहे. यालाच गुप्त कर्तव्य म्हणतात. तो विश्वकल्याणकारी आहे, आणि तितकाच गुप्त रूपात आहे. नाहीतर इथे गर्दी उसळल्यास सांभाळता सांभाळता पुरेवाट होईल. आतासुद्धा कितीतरी निमंत्रणें देऊनही अनेक जण इथपर्यंत पोहोचतदेखील नाहीत. आणखी सहकार्याचे हात मिळाले तर आम्ही कर्मबंधातून मोकळे होऊ आणि पुरुषार्थ करून लवकर लायक बनू, असे तुम्ही बाबाना सांगता. पण बाबा म्हणतात, आहे त्याच परिस्थितीत तुम्हाला योग्य बनून दाखवायचे आहे. बाबा येतात सद्गती देण्यासाठी; पण त्याआधी बाबांना सर्वांना पवित्र बनवायचे आहे. आपण पवित्र बनल्यावरच, बाबा सत्ययुगात नव्या जगांत घेऊन जातील!

(ज्ञानवीणा-१२/९/१९५९)
भावानुवाद : ब्र. कु. विनय-ठाणे (प.)

***

(पान क्र. ४ वरून)

त्यावरूनच संस्थेत एक काव्यही रचले आहे - 'अब घर जाना हैं के अब घर जाना हैं', बडी दीदींचे शब्द ईश्वरी यज्ञात अजरामर झाले. दि. २८ जुलै १९८३ रोजी ह्या महान तपस्विनी, परमश्रध्देय, आदरणीय 'बडी दीदी' आपला भौतिक देह सोडून अव्यक्त वतनवासी झाल्या. आजही त्यांच्या अविस्मरणीय आठवणी हृदयपटलावर ताज्या आहेत!

***

सद्‌गुरुवारचा प्रसाद – एक आगळा–वेगळा अनुभव

ब्र. कु. अशोक, बी. के. कॉलनी, शांतीवन

१९८० च्या दरम्यान मी रॅलीज इंडिया कंपनीत नोकरी करत असतानाची ही घटना आहे. रॅलीजचा कारखाना मुलुंडला होता आणि जायच्या वाटेवरच आपले सेवाकेंद्र होते. आपल्या प्रथेप्रमाणे सद्‌गुरुवारचा प्रसाद (आपण हिंदीत भोग म्हणतो) घेऊन मी पुढे जात असे.

आमच्या कंपनीत मला सकाळची पाळी (शिफ्ट) किंवा दुपारची पाळी असे. जेव्हा दुपारची पाळी असे तेव्हा काम संपल्यावर इतर सहकाऱ्यांशी अध्यात्मावर चर्चा होत असे. कंपनीतल्या मित्र–मंडळींना अनेक विषयांत कुतूहल असे. उदाहरणार्थ – मनुष्याला पुनर्जन्म मनुष्याचाच मिळतो का? पिंडाला कावळा शिवतो म्हणजे काय घडत असावं? असे विविध विषय असत. एक दिवस 'दुसानी' नावाचा एक सहकारी माझ्या टेबलपाशी आला. जरा गंभीर चेहऱ्याने समस्या सांगायला त्याने सुरुवात केली.

तो गिरगावात राहत असे. मुलुंडपर्यंत रेलवेने व पुढे बसने कंपनीपर्यंत असा प्रवासाचा नित्यक्रम ठरलेला होता. गेले काही दिवस एका विचित्र अनुभवातून तो जात होता. सकाळी घरातून बाहेर पडल्यावर त्याच्यामागे कावळे लागत होते. त्याला टोचा मारायला पाठलाग करत असत. अगदी मुलुंडला स्टेशनला उतरून बसमध्ये बसेपर्यंत कावळे त्याचा पिच्छा पुरवत. संध्याकाळी घरी जातानाही तोच अनुभव त्याची पाठ सोडत नसे. या त्रासातून सुटका व्हावी म्हणून तो पाऊस नसतानाही छत्री वापरू लागला होता. असा विचित्र आणि अविश्वसनीय अनुभव मी पहिल्यांदाच ऐकत होतो. मी ते डोळ्याने पाहिलेदेखील होते आणि हा विषय कंपनीत करमणुकीचा झाला होता. त्या दिवशी योगायोगाने बुधवार होता. मी त्याला म्हटले, बघू काय करता येते. माझ्या मनांत विचार आला, दुसानीला आपण बाबांचा सद्‌गुरूवारचा प्रसाद द्यावा. याला काहीतरी फायदा होईल असे मनापासून वाटत होते.

सद्‌गुरुवारच्या अमृतवेळेच्या योगांत दुसानीबाबत बाबांना मी अतिशय प्रेमाने आणि कळकळीची विनंती केली. नंतर नेहमीप्रमाणे मुलुंड सेवाकेंद्रावर गेलो. गोदावरीदीदी भोग लावण्यास बसल्या; पण मला दीदींशी याबाबत बोलायला अवधी मिळाला नव्हता. कामावर जायची वेळ झाली आणि मी प्रसाद खाऊन दुसानीकरिता वेगळी पुडी बांधून घेणारच होतो. तितक्यात न मागतां दुसऱ्या एका बहिणीने स्वतःहून अजून एक पुडी माझ्या हातावर ठेवली. क्षणभर मी बघतच राहिलो, बाबांनाच काळजी होती, जणू बाबाच सगळं करत होते.

दुसरी पुडी घेऊन कंपनीत गेलो आणि दुसानीला प्रसाद लगेच खायला लावला. कामाच्या गडबडीत, नंतर या विषयावर मी त्याच्याशी चर्चाही करू शकलो नाही.

त्या दिवशी संध्याकाळी त्याला अद्‌भुत प्रत्यय आला. कावळ्यांनी जराही त्रास दिला नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी कामावर येतानाही त्याला तसाच सुखद अनुभव आला आणि तो इतका आनंदीत झाला की विचारूच नका. या त्रासापासून सुटका व्हावी यासाठी त्याने पंधरा दिवसांत अनेक गंडेदोरे, मांत्रिक–तांत्रिक असं बरंच

(पान क्र. २७ वर)

...लाईट हाऊस (१९३६) ते माईट हाऊस (१९६५)... मातेश्वरी जगदंबा-सचित्र जीवनपट...!

मम्मांचे जन्मस्थान - अमृतसर

राधा भवनातील
मम्मा
- कराची

निर्मलशांतादादी व मम्मा - कराची

" मैं आत्मा परमधामनिवासी हूँ "

(लाईट हाऊस)

यज्ञ इतिहासातील एक सुवर्ण क्षण - बाबांनी सर्व संपत्तीचा ट्रस्ट बनवून कार्यभार मम्मांकडे सोपवला.

देवाबहन (शांतामणीदादींची मोठी बहीण)
- दृष्टी देताना मम्मा

यज्ञ इतिहासातील एक सोनेरी पर्व, कराची

...लाईट हाऊस (१९३६) ते माईट हाऊस (१९६५)... मातेश्वरी जगदंबा-सचित्र जीवनपट...!

कराची ते भारत
ज्या जहाजातून यज्ञ
स्थलांतरित झाला
त्या जहाजाचे नावसुद्धा
योगायोगाने "सरस्वती" होते

किती निरागस चेहरा । पुरुषार्थाचंही दडपण नाही

कोटा हाऊस
(मा.आबू)
मम्मा - बाबांसमवेत
शांतामणीदादी, बडी दीदी,
आत्ममोहिनीदादी

" बाबा को तो कोई हरा नहीं सकता "

पांडवभवनाजवळील
पर्वत- गिरिसान्निध्य
व गुरु सान्निध्याचा
उत्कृष्ट संगम..।

" मम्मा बाबा
की कॉलेज "

...लाईट हाऊस (१९३६) ते माईट हाऊस (१९६५)... मातेश्वरी जगदंबा-सचित्र जीवनपट...!

" हर घडी अंतिम घडी समझो "

पर्वतासमान अचल
मम्मा-बाबा

कुमारकादादी,
आत्ममोहीनीदादी,
गुलजारदादी, गंगेदादी,
शांतामणीदादी, ईशुदादी,
कुंजदादी, सतीदादी,
शीतलमणीदादी व
मम्मा

ईश्वरी सेवेस
प्रयाण करताना....

लौकिक आई रोचा समवेत मम्मा

बृजशांतादादी, रमेशभाई
व मम्मा

...व्हाईट हाऊस (१९३६) ते व्हाईट हाऊस (१९६५)... मातेश्वरी जगदंबा-सचित्र जीवनपट...!

मातेश्वरींची वाणी स्पूलवर रेकॉर्ड करताना श्रीनरेंद्रभाई

घाटकोपर सेवाकेंद्र - फाकुमाई, नलिनीदीदी व मम्मा

संपूर्ण मनुष्यसृष्टीरूपी कल्पवृक्षाचे मात - पिता..

डोंबिवलीच्या प्रेमदीदीसमवेत मम्मा

" हुकमी हुकम चलाए रहा हैं "

" कर्मातीत अवस्था " (व्हाईट हाऊस)

पुढील कार्यासाठी ...मातेश्वरींचे प्रयाण आणि....अलविदा...!

मातेश्वरींचे सोज्वळ जीवन

ब्र. कु. अश्विनी, ठाणे (प.)

मम्मांचा उल्लेख जगदंबा आणि सरस्वती अशा दोन्ही नावाने केला जातो. मातेचे निःस्वार्थ प्रेम आणि विद्येच्या देवीचे ज्ञानयुक्त स्वरूप या दोन्हीचा अनोखा संगम आपल्याला मम्मांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला दिसतो. मम्मांबद्दल आजपर्यंत अनेक जणांनी आपले अनुभव सांगितले आहेत. कुणी त्यांच्या तेजस्वितेचे वर्णन केले आहे, तर कुणी साधेपणाचे. कुणी त्यांच्या प्रेमस्वरूपाचे वर्णन केले आहे, तर कुणी निर्भय शक्तिरूपाचे ! या सर्वच अनुभवांवरून मम्मा एक परिपूर्ण व्यक्ती होती असे आपल्या लक्षात यायला वेळ लागत नाही.

मम्मांची एकाग्रतेची शक्ती विस्मयकारक होती. मम्मा कधीही कोणत्याही वेळी आपली बुद्धी शिवबाबांवर सहज एकाग्र करू शकत असत. या एकाग्रतेमुळे त्यांच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाला विस्मयकारी अनुभव येत इतकी त्यांची आध्यात्मिक शक्ती प्रगल्भ झाली होती. मम्मांशी पहिली भेट झाली, त्यावेळी आपण देहभान विसरलो, आपल्याला या देहाची स्मृती राहिली नाही, आणि त्याचबरोबर एका अलौकिक आनंदाची अनुभूती झाली असे वर्णन कित्येकांच्या अनुभव वर्णनांत सापडते. गंमत म्हणजे मम्मांशी आधी फारसा परिचय नसताना, त्यांना पहिल्या प्रथम भेटतानाच असा अनुभव आला असे प्रत्येक व्यक्तीने आवर्जून नमूद केले आहे, हे थक्क करणारे आहे...

मम्मांच्या सहवासात किंवा त्यांचे शब्द ऐकताना आपले आयुष्य त्यांच्यासारखेच घडवावे अशी प्रेरणा मिळत असे, असा अनुभव त्यांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाने सांगितला आहे.

मम्मांची पवित्रता अतिशय उच्च कोटीची होती. पवित्रता म्हणजे शुद्ध आत्मिक भान. कोणतीही परिस्थिती वा व्यक्तीचा प्रभाव आपल्या मूळ शुद्ध आत्मिक स्थितीपासून विचलित करू शकत नाही, हा पवित्रतेचे गुह्य अर्थ आहे. मी शुद्ध आत्मा आहे, देह नाही, हे सत्य जेव्हा आपण वारंवार स्मरण करतो, तेव्हा या आत्मिक भानामुळे प्रत्येक कर्म , बोल आणि विचारातून शुद्धी प्रतीत होऊ लागते. मम्मा सदैव आत्मिक भानामध्ये राहत असत, त्यामुळेच त्यांच्या प्रत्येक कृतीतूनच नव्हे तर त्यांच्या केवळ उपस्थितीमुळे वातावरणात पवित्रतेची प्रकंपने पसरत आहेत, असा अनुभव प्रत्येकाला होत असे.

दिल्लीचे ब्रह्माकुमार विद्यासागर भाई ईश्वरी मार्गातील आपल्या सुरुवातीच्या काळातील अनुभव सांगतात. विद्यासागर भाईनी ज्ञानमार्गात येण्याअगोदर अनेक ईश्वरभक्तांचे अनुभव वाचले होते, ऐकले होते. अनेक शास्त्रे, वेद-उपनिषदांचे सार वाचून स्वतःमध्ये धारण करण्याचा ते प्रयत्नही करत असत. मम्मांना प्रथम भेटले त्यावेळी ते नुकतेच ज्ञानमार्गाच्या संपर्कात आले होते.

मम्मा दिल्लीच्या राजौरी सेवाकेंद्रावर आल्या होत्या त्यावेळी विद्यासागर भाईंची प्रथम भेट झाली. ते सांगतात, मम्मांना पाहताच मला या शरीराची स्मृतीच राहिली नाही. मला इतका दिव्य प्रकाश आणि पवित्रतेचा अनुभव झाला. अतिशय सुखद अशा आनंदलहरींनी मला भारून टाकले. मम्मांच्या भेटीत त्यांच्या पवित्रतेच्या प्रकाशामुळे माझ्या मनातले मळभ दूर झाले, आणि ज्ञानाचे पूर्ण अनुसरण करण्याचे मी त्याच क्षणी मनाशी ठरवले. त्यानंतर जितक्या वेळा मी मम्मांना भेटलो, तेव्हा प्रत्येक वेळी मला त्यांच्या पावित्र्याच्या शक्तीने स्वतःमधील दोष आणि कमतरता नष्ट होत असल्याचे प्रत्यक्ष जाणवले. पवित्रता जणू त्यांच्या

प्रत्येक श्वास-श्वासातून पाझरत असे! त्यांच्याकडून दैवी गुण धारण करण्याचे वरदानच मला लाभले.

त्यांचे दिव्य स्मितहास्य, आत्मिक दृष्टी आणि मधुर वाणीमधून सतत सुखाचा आणि शुभभावनांचा वर्षाव होत आहे असे वाटे. मम्मा केवळ उपदेश करीत नसत, किंवा बाबांनी सांगितलेले ज्ञान केवळ पाठ करून सांगत नसत. ते ज्ञान त्या आधी स्वतःमध्ये संपूर्ण धारण करीत असत. मम्मांची ही 'धारणा' त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसत असे. मी या गोष्टींचे बारकाईने निरीक्षण करत असे... मम्मांनी एकही शब्द निष्काळजीपणाने उच्चारलेला मला आठवत नाही, त्यांच्या प्रत्येक शब्दांत ज्ञान आणि योगाची शक्ती असे, त्यांचा आंतरिक गोडवा त्या शब्दांत दिसत असे. मम्मांची वाणी अतिशय ओघवती आणि रसपूर्ण होती. त्यांच्या वाणीत ऐकणाऱ्याच्या जीवनात आध्यात्मिक परिवर्तन करण्याची शक्ती होती. त्यांचे शब्द सागरासारखे सखोल, आकाशासारखे सदैव उच्च आणि गंगेसारखे निर्मल प्रवाही असत.

ज्ञानमार्गात आल्यानंतर बाबा आणि मम्मांच्या निस्सीम प्रेमामुळे अनेकांना यज्ञात समर्पित होण्याची प्रेरणा मिळत असे. विद्यासागर भाईंनी एकदा मम्मांसमोर समर्पित होण्याची इच्छा व्यक्त केली. त्यावेळी मम्मांनी त्यांना यज्ञात समर्पित जीवन न जगता भीष्म पितामहांप्रमाणे लौकिक जगतात राहूनही ब्रह्मचर्याचे पालन करून आपल्या माता-पित्यांची सेवा करण्याचा आणि याबतीत युवकांसाठी एक प्रत्यक्ष उदाहरण घालून देण्याचा सल्ला दिला. याप्रकारे प्रत्येक आत्म्याचे वैशिष्ट्य आणि विशेष भूमिका आपल्या दिव्य बुद्धीने पारखून अचूक निर्णय देण्याचे मम्मांचे कसब अद्वितीय होते.

या अचूक निर्णयशक्तीचे कारण म्हणजे त्यांची दिव्य बुद्धी. तीक्ष्ण बुद्धी अनेकांची असते, परंतु मम्मांची बुद्धी ही दिव्य बुद्धी होती. दिव्य बुद्धी ही केवळ निरंतर आपल्या मूळ आत्मिक स्वरूपाचा अभ्यास आणि सदैव ईश्वरी ज्ञानाचेच सखोल मंथन यामुळेच प्राप्त होते. मनांत आलेले विचार ज्ञानाच्या आधारावर तपासून पाहणे आणि केवळ ज्ञानयुक्त विचारांचे चिंतन करणे यामुळे बुद्धी दिव्य होते, व त्यानुसारच मग कर्म केले जाते.

ब्रह्माकुमार करुणा भाई आपला अनुभव सांगतात, एकदा मी काही कारणाने खूप अस्वस्थ झालो होतो, आणि तशाच अवस्थेत मम्मांकडे जाऊन म्हणालो, बास झाले, मला आता हे सहन होत नाही!' मम्मांनी शांतपणे मला विचारले, तू प्रेशर कुकर पहिला आहेस? मी म्हणालो होय, त्यात वाफेचा खूप दाब निर्माण झाला की जोरात आवाज करून शिट्टी होते. मम्मा हसून म्हणाल्या, तू त्यातला एक नाहीस ना? आणि त्यानंतर त्यांनी मला एक अमूल्य शिकवण दिली. त्या म्हणाल्या, सहनशक्ती धारण केलीस तर नंबर वन होशील! त्यांच्या प्रत्यक्ष जीवनात मी हे कित्येकदा पाहिले आहे. त्यांच्या जीवनात सुरुवातीपासून अनेक समस्यांचा त्यांना धैर्याने सामना करावा लागला आणि सहनशक्तीच्या जोरावर त्या अव्वल ठरल्या. त्या दिवसापासून सहनशक्ती हा जीवनाचा मंत्र बनवायचा हे मी मनाशी ठरवून टाकले.

मम्मांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, त्या लहान-मोठ्या सर्वांना समजून घेऊन त्यांना आधार देत असत. त्यांच्या आध्यात्मिक प्रगतीसाठी प्रेमाने मदत करत असत. एखाद्याकडून काही चूक झाली, तरीही त्या कधी रागावत नसत, उलट प्रेमाने जवळ बसवून त्यांच्या चुका समजावून सांगत, त्यांच्या शंकांचे समाधान करत. यामुळे ती व्यक्ती आपसूकच आपल्या चुका जाणून त्या सुधारण्याचा विचार करीत असे. मम्मा म्हणत, तीव्र पुरुषार्थी व्यक्ती चूक करत नाही असे नाही. परंतु एकदा केलेली चूक पुन्हा न करणे, हे तीव्र पुरुषार्थी आत्म्याचे लक्षण आहे. मम्मांनी स्वतःच्या आयुष्यात एकदा केलेली चूक कधीच पुन्हा केली नाही, म्हणूनच मम्मा पुरुषार्थात अव्वल ठरल्या.

त्या लहानांबरोबर लहान होऊन, युवकांसोबत युवा होऊन आणि वृद्धांबरोबर प्रौढ बनून त्यांना समजून घेऊ शकत आणि समजावून सांगूही शकत. प्रत्येकाला समजेल, पटेल अशा पद्धतीने बाबांच्या ज्ञानाचा अर्थ त्या

उलगडून सांगत आणि तो त्यांच्या आयुष्यात कसा धारण करता येईल हेही सांगत. बाबांची मुरली म्हणजे हिरे, मोती माणके पाचू यांचा अमर्याद खजिना! या खजिन्यातून मम्मा आवश्यक तेव्हा कधी मोती वेचून आमच्यासमोर ठेवायच्या, तर कधी हिरे!

एखाद्या सेवाकेंद्राला दिलेल्या भेटीच्या वेळी मम्मा अगदी प्रत्येकाकडे जातीने लक्ष देत असत. त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मदत करीत असत. मम्मांना भेटल्यावर प्रत्येकजण आपले सारे दुःख विसरत असे, प्रत्येकाचे हृदय आनंदाने उचंबळून येत असे! ज्येष्ठ बंधू-भगिनीसुद्धा आपले वय, हुद्दा, समाजातील स्थान वगैरे विसरून एखाद्या लहान मुलाप्रमाणे मम्मांच्या समोर बसत. ज्या ज्या शहरात त्या गेल्या, तिथल्या ब्रह्माकुमारी सत्संगापासून ते वैज्ञानिक धार्मिक संमेलनात देखील त्यांनी भाषणे केली. त्यांचे शब्द त्यांच्या आचरणांत दिसत असल्यामुळे अनेक लहान -मोठ्या व्यक्तींवर त्यांच्या भाषणांचा प्रभाव पडत असे. त्यांच्या मुखाद्वारे परमात्म्याचे ज्ञान प्रथम ऐकलेले अनेक लोक आज संस्थेत अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत.

मम्मांचा सर्वात महत्त्वाचा गुण म्हणजे बाबांवर संपूर्ण निश्चय! सर्वशक्तिमान परमात्मा ब्रह्माबाबांच्या शरीराद्वारे कार्य करीत आहे, हे मम्मांनी पूर्णपणे जाणले होते. मम्मांसाठी बाबांचे वाक्य म्हणजे खरोखरच ब्रह्मवाक्य असे. त्यासमोर त्या स्वतःची बुद्धीदेखील समर्पित करीत असत. हरिद्वारच्या ब्रह्माकुमारी प्रेमलता दीदींनी आपल्या लहानपणीचा एक अचंबित करणारा अनुभव सांगितला आहे. पांडव भवनमध्ये बाबांच्या पर्णकुटीत एकदा पक्ष्यांनी घरटं केलं होतं आणि त्या घरट्यात दोन छोटी अंडी घातली होती. लच्छु बहन ती सर्वांना दाखवत होत्या. बाबानी अंडी पाहिली आणि गमतीने म्हणाले, मम्माला इथे येण्याचा निरोप द्या. मम्मा येताच बाबा काय सांगतात ते मी कुतूहलाने ऐकू लागले. बाबा म्हणाले, मम्मा तोंड उघड. बाबा तुला अंडी खाऊ घालणार आहेत! आणि मम्मांनी क्षणाचाही विलंब न करता एखाद्या लहान मुलाप्रमाणे तोंड उघडले! मला आश्चर्याचा धक्काच बसला! बाबांच्या मुखावर मंद स्मित झळकले. मम्मांना प्रेमपूर्वक दृष्टी देऊन ते म्हणाले, मम्मा 'जी, बाबा'च्या परीक्षेत पास झाली. माझ्या मनांत विचारांचा गोंधळ उडाला. खरंतर या लहानशा प्रसंगातून बाबांनी अढळ निश्चय कसा असावा ते मम्मांच्या उदाहरणातून साऱ्यांना दाखवून दिले. ब्रह्माबाबांच्या शरीराद्वारे करविणारा परमात्मा शिव आहे. तो विश्वकल्याणकारी आहे. त्यामुळे त्यांच्यावर अढळ निश्चय ठेवून संपूर्ण निश्चिन्त होऊन त्याचे श्रीमत पूर्णतः स्वीकारणे यातच आपले खरे कल्याण आहे, असा संदेश दिला. अशी होती मम्मांची संपूर्ण समर्पण वृत्ती !

बाबांची प्रत्येक लहान-मोठी गोष्ट मम्मा श्रीमत म्हणून स्वीकारत असत. बाबांची प्रत्येक सूचना व आज्ञापालन केलं तर आपली बुद्धी दिव्य होते असं जेव्हा मम्मांनी सांगितलं तत्क्षणी मी ठरवले- यापुढे बाबांच्या प्रत्येक श्रीमताचे पालन कोणताही प्रतिप्रश्न न करता करायचे. या प्रसंगाने माझे आयुष्य बदलून टाकले. त्या प्रसंगात मम्मांनी माझ्या मनावर जो संस्कार केला, त्याने आयुष्यातील अनेक प्रसंगात मला मदत केली. सरळ स्वभावामुळे मी प्रत्येक गोष्टीत समाधानी आणि आनंदी राहू शकले.

अशाप्रकारे मम्मांनी आयुष्यात केलेले निर्णय, त्यामागचा त्यांचा उद्देश, त्यांची विचार करण्याची पद्धत या सर्वच गोष्टी आपल्याला पुष्कळ शिकवण देतात. त्या अव्वल का ठरल्या हेही कळते. मम्मांच्या जीवनातील हे सारे अनुभव वाचून व ऐकून आपणही आपली उन्नती साधणे हाच सर्वात मोठा उद्देश आहे. आपल्या मराठी भाषेंत सोज्वळ शब्दाचे काही अर्थ असे आहेत- स्वच्छ, निर्मळ, चकचकीत आणि प्रकाशमान. यामधील सगळीच विशेषणे त्यांना लागू होतात; पण शेवटचे जास्त चपखल वाटते. अनेकांचे जीवन मातेश्वरींच्या सहवासाने उजळून गेले.

***

शांतीच्या दिव्य पारसमणी, शांतीच्या देवी : दादी शांतामणी

ब्र.कु. हेमंत, शांतीवन

साहित्य, विज्ञान, अर्थशास्त्र, वैश्विक शांतता या क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना जगभरातील सर्वात जास्त गौरविले जाणारे नोबेल पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात येते. तरीही आजपावेतो संपूर्ण विश्वात शांती स्थापन करण्याचे अनेक प्रयत्न असफल झालेले दिसतात. कलियुगाच्या अंतिम टप्प्यावर शांतीचा सागर परमात्म्याचं दिव्य अवतरण झाल्यावरच सुख-शांतीची पुनर्स्थापना करण्याच्या कार्यास आरंभ होतो. या महान कार्यासाठी 'शिव' परमात्म्याद्वारे स्थापन झालेल्या रुद्र ज्ञान यज्ञात, ज्यांनी शिवबाबांची शिकवण (श्रीमत) प्रत्यक्ष जीवनात धारण केली, सदैव आत्मिक स्वरूपात राहून वातावरणात शांत, पवित्र उर्जा प्रवाहित केली, दीपस्तंभ बनून अनेकांना प्रेरणा दिली अशा काही मोजक्या मंडळींपैकी एक दादी 'शांतामणी' होत्या.

फाळणीपूर्वीच्या अविभाजित भारतातील सिंध प्रांतात संपन्न व धार्मिक 'सखरानी' कुळांत शांतामणी दादींचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव 'लीला' होते. आई-वडील, एक भाऊ व चार बहिणी असा मोठा परिवार होता. दादींचे आजोबा प्रताप सखरानी एक सज्जन व त्याकाळचे समाजातील प्रतिष्ठीत व्यक्तींपैकी होते. वडिलांचा श्रीलंकेत चांगला तेजींत असलेला व्यवसाय होता.घरांतच छानसे देवघर होते, दादींच्या आई सती, जपसाहिब सुखमणी अशा ग्रंथांचे वाचन करीत. ह्या जगांत सुखाच्या सोबतीला कधी ना कधी दुःख येतेच. दादींच्या आईच्या बहिणी रोचा व ध्यानी अकाली आलेल्या वैधव्यामुळे पतीनिधनाने दुःखी होत्या. भक्ती, व्रत-वैकल्ये आदी करूनही मनःशांती मात्र नव्हती. झालेले दुःख विसरतां विसरे ना अशी स्थिती होती. या मावश्यांना भेटायला दादींची आई सती (दादी) जात असत. एके दिवशी जसोदामैया म्हणजे दादा लेखराजांची पत्नी सतींना भेटल्या. त्या बोलाचालींत जसोदामैयांनी दादा लेखराज अर्थात् ब्रह्माबाबांच्याद्वारे दिल्या जाणाऱ्या ज्ञानाचा उल्लेख केला व सत्संगात येण्याचे निमंत्रणही दिले. साकार ब्रह्माबाबांच्या मुखातून 'शिव' परमात्म्याची अमृतवाणी ऐकून त्या सगळे दुःख विसरल्या. आत्मा, परमात्मा, सृष्टिचक्राचे सत्य ज्ञान आत्मसात करत असताना लीला अर्थात शांतामणी दादींनाही श्रीकृष्णाचा दिव्य साक्षात्कार झाला. दैवी गुण व श्रेष्ठ संस्कार धारण करून देवलोकी (सत्ययुगात) जाण्याचा कृतनिश्चय झाला.दादी सतींनी आपल्या बहिणींनाही सत्संगात जोडले.

यातील रोचा यांची मुलगी राधाही सत्संगात गेली असता साकारबाबा म्हणाले बेटी मी तुझीच वाट पाहत होतो. राधा अभ्यासांत, गायनविद्येत, व अनेक कलांत निपुण होती. पहिल्याच भेटीत बाबांनी तिला विचारले, तुला पुढील आयुष्यांत काय करायचे आहे. मोरमुकुटधारी आपला जीवनसाथीदार म्हणून निवडायचाय की पॅण्ट-शर्टवाल्याला. राधेने तत्क्षणी निर्णय केला आणि सांगितले-मोरमुकुटधारी. लौकिकार्थाने शांतामणी दादींची मावसबहीण असलेली ही 'राधा पुढे 'यज्ञमाता जगदंबा सरस्वती' म्हणून प्रसिध्द झाली; पण तो झाला पुढचा इतिहास. त्याआधी जेव्हा रोचा,सती या बहिणी सत्संगात जाऊ लागल्या त्यादरम्यान ब्रह्माबाबा काश्मिरला गेले होते आणि योगायोगाने शांतामणी दादींचे वडील रीझूमलही काश्मिरांत होते. जीवा-शिवाची (आत्मा-परमात्म्याची)

भेट होण्याचा तो अद्भुत प्रसंग. दादा रीझूमल पहलगामचा रस्ता विचारण्याच्या निमित्ताने योगायोगाने दादी निर्मलशांताच्या समोर गेले. निर्मलशांतादादींनी पठडीतले उत्तर न देता त्यांना सांगितले, पहलगाम नाही; पण परमधामचा रस्ता सांगू शकेन. त्यायोगे दादा रीझूमल बाबांच्या समोर गेल्यावर त्यांना अलौकिक अनुभव झाला. मनाच्या उन्मनी अवस्थेत त्यांनी ब्रह्मांडाचा अनुभव केला. या अलौकिक अनुभवानंतर त्यांच्या मनावर आध्यात्मिकतेची छापच उमटली. जीवनाची इतिकर्तव्यता यातच आहे, जे प्राप्त करावयाचे होते ते मिळाले ही तृप्ती आली. पुढे सिंध हैद्राबादला परतल्यावर दादा रीझूमल आपल्या संपूर्ण कुटुंबासह, तन-मन-धनाने ईश्वरी यज्ञांत समर्पित झाले. शांतामणी दादींचा अलौकिक जीवनप्रवास निर्विघ्न सुरु झाला.

सन १९३७ च्या दीपावलीच्या सुमुहूर्तावर, ब्रह्माबाबांनी मुलांसाठी उघडलेल्या बोर्डिंगचा प्रारंभ झाला. १४ - १५ वर्षांच्या शांतामणी दादींसह आणखी ४ बहिणींची शिक्षिका म्हणून नेमणूक करण्यात आली. ज्ञान, योगाची शिकवण देण्याबरोबरच मुलांची वैयक्तिक स्वच्छता, आहार-विहार-निद्रा याकडेही त्यांचे लक्ष असे. अर्थातच बाबांच्या सबल मार्गदर्शनाखाली दादींसारख्या बालशिक्षिका व इतर मुले-मुली शिकू लागली.अंतर्बाह्य स्वच्छ, शुध्द, निर्मळ मनाच्या दादींना, बाबा कौतुकाने 'सचली कौडी' तसंच 'हर की पौडी' म्हणत असत. खरोखरच दादी म्हणजे शांत, पवित्र प्रेमाची गंगा होत्या. या शिवशक्तिच्या सानिध्यात येणारी प्रत्येक व्यक्ती जणू पापमुक्त झाल्याचा अनुभव घेई. त्या महान तपस्विनी 'राजयोगिनी' होत्या. या वैशिष्ट्यामुळे कल्पवृक्षाच्या चित्रांत मम्मा-बाबांसमवेत मुळाशी बसून गहन तपस्या करताना, विश्वाला शांतीचं दान देताना दिसतात. यज्ञाच्या सुरवातीच्या काळात त्या यज्ञाची भंडारी (धनराशी) सांभाळण्याचीही सेवा करत. आबूला आल्यानंतर भारतातील विविध ठिकाणी ईश्वरी सेवा सुरु झाली. सेवेसाठी निमित्त बनून दिल्ली, पटना, कर्नाल येथे दादींनी वास्तव्य केले. लखनऊ येथे त्यांनी दीर्घकाळ सेवा केली. ब्रह्माबाबा अव्यक्त झाल्यावर त्या, मधुबनमध्ये सेवेत असणाऱ्या व्यक्तींच्या प्रभारी (इनचार्ज) होत्या.

बाबांनी लहानपणी केलेल्या संगोपनात या सर्व दादींवर कुशल प्रशासनाचेही संस्कार केले होते. परिस्थिती आणि माणसांची अचूक पारख, स्वभाव आणि बोलण्यातील गोडवा, कमालीचा समजूतदारपणा आणि संयम या विशेष गुणांमुळे दादींनी शांतीवनचे प्रशासन फार प्रभावीपणे केले. एखादा लहान मुलगाही निःसंकोचपणे त्यांना भेटू शकत असे. शांतीवननिवासी असो, वा कुणी अपरिचित, त्यांच्याजवळ आपले मन मोकळे करून कुणीही आपल्या मनावरचा भार हलका करू शकत असे. त्या कायम आईप्रमाणे जवळ बोलावून प्रेमाने धीर देत. एखाद्याकडून काही कारणाने चूक झाली, तर अल्प शब्दांमध्ये प्रेमाने समजावून सांगत, आणि त्याला संतुष्ट करत. न्याय करण्याच्या आपल्या अनोख्या शैलीने गुंतागुंतीच्या गोष्टींचाही सहज निवाडा करत. शांतामणी या नावाप्रमाणेच त्या कायम शांत आणि अचल असत.

शांतीवनच्या राई दीदींनी त्यांच्या सानिध्यात राहून प्रत्यक्ष पाहिलेली वैशिष्ट्ये सांगितली आहेत. दादी स्वतःवर कधीच एक पैही अनावश्यक खर्च करीत नसत. साधे कपडे वापरत असत. त्या अतिशय साधे आणि फिके भोजन ग्रहण करीत असत. स्वतःसाठी वेगळे खास भोजन वगैरे त्यांनी कधीही स्वीकारले नाही. शांतीवनच्या प्रशासिका असूनही कित्येक वेळा शांतीवनच्या सार्वजनिक भोजनगृहात येऊन सर्वांबरोबरच भोजन ग्रहण करीत असत. शांतीवनच्या प्रत्येक विभागामध्ये स्वतः फेरी मारून भेट देत असत. यज्ञाच्या धान्य विभागात त्यांना स्वतः धान्य निवडताना अनेकांनी पाहिले असेल. अशा प्रकारे अतिशय साधेपणाने राहून सेवा करून कर्माद्वारे इतरांना ही शिकवण देत असत.

शांतीवन स्वयंपाकगृहातील मनीष भाईं दादींच्या प्रेमळ व्यवहाराचा अनुभव अशा प्रकारे सांगतात. मला सेवा करण्याची खूप इच्छा होती त्यामुळे कोणाच्या तरी सल्ल्यावरून मी दादीना भेटायला त्यांच्या ऑफिसमध्ये गेलो. बघतो तर काय, एका लहानशा खोलीत

एक छोटा टीपॉय आणि एक सोफासेट इतकेच ऑफिस होते . त्यांचा साधेपणा पाहून मी अत्यंत प्रभावित झालो. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन सेवेसाठी येथेच राहण्याचा मनातला संकल्प मी त्यांच्यासमोर मांडला. तेव्हा त्यांनी निमित्त सेवाकेंद्र शिक्षिका बहिणीबरोबर मला भेटायला बोलावले आणि स्वयंपाकगृहामध्ये सेवेत रुजू करून घेतले.

त्यांनतर त्या मला रोज भेटू लागल्या, त्या नेहमीच प्रेमाने सर्व गोष्टी समजवित आणि काही न काही शिकवण देत. मी त्यांच्या ऑफिसमधे त्यांना भेटायला गेल्यावर कधीतरी वर्तमान पत्र वाचत बसत असे, पण ते त्यांना आवडत नसे. त्यांनी मला पेपर वाचण्यासाठी फक्त मनाईच केली नाही तर स्वतःसाठीसुध्दा वर्तमानपत्र बंद केले. आम्ही काही शांतीवन निवासी रोज खेळायला जात असू. तेव्हा कधीतरी तिथे आल्या तर म्हणत, 'जरूर खेळा, पण त्यांनतर योगासाठी वेळेवर या. त्या नेहमी मला संदलीवर बसून योग करायला सांगत. मला खूप संकोच वाटत असे, कुणी मला का बसतोस म्हणून डिवचत असत, परंतु त्या पुन्हा पुन्हा मला योग करण्यासाठी प्रेरणा देऊन प्रोत्साहित करीत.

दादींच्या अगदी शेवटच्या काळातील एक अद्भुत अनुभव मी कधीच विसरू शकत नाही. मी दादींना रोज भोजनाचा डबा द्यायला जात असे. एके दिवशी जेव्हा गेलो तेव्हां दादीं एकांतात शक्तिशाली स्थितीत बसल्या होत्या. खोलीचे वातावरण अत्यंत शक्तिशाली झाले होते. त्यांचे दोन्ही डोळे खूपच लाल झालेले दिसत होते. त्या उजव्या गुडघ्यावर हात ठेवून हाताची बोटं गोल गोल फिरवत होत्या आणि कुठेतरी दूर-दूर पाहत होत्या. मी तिथे तसाच २० मिनिटे बसून होतो, मला तिथून उठायची इच्छाच होत नव्हती. दुसऱ्या दिवशी मी दादींना विचारले, 'दादी, तुम्ही काल काय करत होतात ?' तेव्हा हसत हसत बोटाने इशारा करून त्या म्हणाल्या, 'मी मुक्ति जीवनमुक्ति देत होते. एकीकडून माझ्यासमोर छोट्या छोट्या चांदण्यांसारखे आत्मे येत होते, थोडा वेळ थांबत होते, आणि कुणी मुक्ति, तर कुणी जीवनमुक्ति घेऊन दुसऱ्या बाजूने जात होते.' दादी अशाप्रकारे सांगत होत्या जणू काही त्या स्थूल नेत्रांनी आत्म्यांना येताना व जातांना पाहून दृष्टी देऊन त्यांना मुक्त करीत होत्या. त्यांचे नाव घेताच मला त्यांचे ते योगी नेत्र आठवतात.

दादीच्या असीम प्रेमाची प्राप्ती मलाही झाली, याचे मलाही समाधान वाटते. मातेश्वरी जगदम्बांना मी कधी प्रत्यक्ष भेटू शकलो नाही. पण शांतामणी दादींच्या प्रथम भेटीतच ही खंत नाहीशी झाली! दादी शांतामणी लौकिक नात्याने मम्मांच्या मावस बहीण होत्या. त्यांचा हूबेहूब मम्मासारखा दिसणारा चेहरा, गंभीर योगयुक्त मुखमण्डल पाहून मम्मांचाच भास होत असे. दादींचा उमलत्या गुलाबाच्या फुलासारखा प्रसन्न चेहरा व त्यावर उमटलेले मधुर हास्य सर्वांनाच मोहून घेत असे. पाण्डवभवन मधे एकच खाट मावू शकेल इतक्या लहानशा जागेत राहूनही त्यांना कसलीही खंत किंवा तक्रार नव्हती. त्या नाम-मान-शान (मान-मरातब) पासून खूप दूर राहत. 'इच्छा मात्रम् अविद्या' अशी त्यांच्या मनाची स्थिती होती.

एकदा परिस्थितीने माझी खूपच कडक परीक्षा घेतली, दादींना सगळी हकीगत सांगितली, तेव्हा दादी म्हणाल्या,'चिंता नही करो, बाबा बैठा है, मख्खन से बाल निकलेगा,' आणि झाले तसेच. त्यांच्या शब्दांमध्ये समस्यांचे निराकरण करण्याची जादूई शक्ती होती.

त्या जशा खूप प्रेम देत, तशाच नियम आणि मर्यादाही अगदी पक्क्या सांभाळत. साप्ताहिक कोर्स झाल्यानंतर एक वर्षाने मधुबनमध्ये परमात्मा मिलनासाठी यावे हा या ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या नियम आहे. एकदा मी एका भावासाठी परमात्म मिलनाची परवानगी घेण्यासाठी दादींकडे गेलो. त्या भावाचा साप्ताहिक कोर्स पूर्ण करून नियमित ज्ञान ग्रहण करून दहा महिने झाले होते. पण दादी म्हणाल्या, 'बारा महिने पूर्ण झाल्यावरच परवानगी देईन.' त्यानेही दादींच्या आज्ञेचे पालन केले आणि त्याचे सुफळ म्हणजे आजतागायत ज्ञानमार्गातील त्याचा प्रवास पूर्ण परिवारासहित निर्विघ्न चालू आहे.

दादी नेहमीच सेवेसाठी हिम्मत आणि बळ देऊन कायम सर्वांना पुढे करत. मलाही सेवेसाठी जायला खूप आनंदाने परवानगी देत. सेवा केल्यानंतर जमा झालेले पैसे, भेटवस्तु त्यांच्याकडे दिल्यावर कौतुक करत, आणि फक्त जरुरी खर्चासाठी रक्कम ठेवून बाकी यज्ञात जमा करायला सांगत. तशाच प्रत्येकाच्या गरजेकडेही लक्ष देत, हिवाळ्यात शाली स्वेटर देत. एकदा अशीच यज्ञांत रक्कम जमा करण्यासाठी गेलो असता मी दादींना म्हणालो की एखादी जुनी सायकल कुणाकडे असेल तर द्या. तेव्हा दादी म्हणाल्या,'पुरानी क्यों? अच्छी नई चीज लो.' आणि दिलेल्या पैशातून काही पैसे सायकल घेण्यासाठी दिले. अशाप्रकारे आईसारखी सर्वांची काळजी घेत.

त्यांना एकदा विचारले, 'दादीजी, तुम्ही काय पुरुषार्थ करता?' तेव्हा त्या म्हणाल्या, 'मी कधीच व्यर्थ आणि नकारात्मक चिंतन करीत नाही. सर्वांसाठी शुभकामना बाळगते.' दादीजींना नेहमी देहात राहूनही देहापासून उपराम कर्मातीत स्थितीतच पाहिले. त्यांच्यात कोणत्याही विकाराचा अंशही बघितला नाही. त्या शेवटपर्यंत अमर्याद वैरागी आणि मुरलीधर शिवबाबांच्या अनुरागी होऊन राहिल्या. कधीच कुणाशी स्वतःची तुलना केली नाही. त्यांच्या चेहऱ्यावर चमकणारे पवित्रतेचे दिव्य तेज आणि वाणीतले ओज चुंबकासारखे सर्वांना आकर्षित करत असे. अखेर शांतीची सरिता अशा दादी आपल्या शांती सागराला भेटायला निघाल्या. संपूर्ण कल्पांत मम्माशी जन्मोंजन्मीचे अलौकिक नाते आणि समानता असल्यानेच की काय जणू दादींनीही संपूर्णत्व प्राप्त करण्यासाठी जून महिनाच निवडला. ८७ वर्षांचे दीर्घायुष्य पूर्ण करून १५ जून २०१० रोजी त्यांनी आपल्या स्थूल देहाचा त्याग केला.

***

वाचक व लेखकांना नम्र आवाहन

अमृतकुंभच्या सर्व वाचकांकडून नेहमीच चांगला प्रतिसाद मिळत राहतो आणि तो तसाच मिळत राहील यात शंकाच नाही. सर्व लेखक व लेखिका उत्स्फूर्तपणे लेखन पाठवित राहतात ते तसेच चालू राहीलच. बदलता काळ पाहता अमृतकुंभाचा मागील अंक ई-प्रत या स्वरूपात काढावा लागला आणि हा अंकही. या पार्श्वभूमीवर काही आवाहन खालीलप्रमाणे करत आहोत.

१. आपले लेखन शक्यतो ई-मेलवर वर्ड फाईलद्वारे पाठवावे. अमृतकुंभाचा ई-मेल पत्ता आपल्या सोयीसाठी इथे पुन्हा देत आहोत. info@amrutkumbh.com. जे लेखक याप्रकारे आपले लेखन पाठवत आहेत त्यांनी ते तसेच चालू ठेवावे.

२. लेख पाठवताना शक्यतो युनिकोड संगणक प्रणालीचा वापर करावा. याचा थोडक्यात खुलासा- जी-मेल किंवा गुगलवर मराठी टाईप करायची चांगली सोय आहे. यात मराठी भाषेचा पर्याय निवडायचा. Try Google Input Tools online या संकेतस्थळावरून अतिशय सोप्या रूपांत मराठीतील लेखन करता येते. टाईप करण्याकरिता 'एमएएलए' असे टाईप केल्यास 'मला' असा मराठी शब्द उमटतो इतके सोपे आहे. अशा प्रकारे लेखन पूर्ण झाले की ते फक्त वर्ड फाईलमध्ये घालून ई-मेलद्वारे पाठवायचे.

३. असे टंकलिखित केलेले लेख जसेच्या तसे मुद्रकाकडे देणे सोपे होते. याशिवाय लेखांत कुठल्याही दुरुस्त्या सहज करता येतात, उपमुद्रीतें (प्रुफे) तपासण्यासही फार वेळ लागत नाही, याकारणास्तव विशेष विनंती.

सर्वांना याप्रकारे लेखन पाठवता येईल ही शुभ आशा आहे. मात्र असा लेख पाठवायला जमणार नसेल तर लेख पाठवायचाच नाही असा अर्थ कृपा करून कुणी घेऊ नये व लेखनही थांबवू नये.

पुढील अंक ऑगस्ट-सप्टेंबरचा असेल. त्यात दादी प्रकाशमणी, तसेच राखी पौर्णिमा, गणेशोत्सव इत्यादी उत्सवांवर आपले चांगले लेखन घडो ही शुभेच्छा !

- संपादक

हिरेतुल्य संगमयुगात श्रीमतानुसार सर्वश्रेष्ठ आचारण करूया!

(भाग – ३)

ब्र. कु. उज्ज्वला, पुणे

जोपर्यंत देव–देवतांची पवित्रता अबाधित असते. तोपर्यंत कोणत्याही प्रकारची आपत्ती त्यांच्या राज्यात निर्माण होऊ शकत नाही. त्रेतायुगाच्या अंताला मनोविकारांची निर्मिती होऊन विकर्मांचा आरंभ होतो व पवित्र देवात्मे ही ज्यावेळी अपवित्र होतात त्यावेळी ह्या मनुष्यसृष्टीत पहिली आपत्ती निर्माण होते भूकंपाची! ह्या भूकंपाद्वारे होणाऱ्या त्रेतायुगाच्या विनाशात दैवी वैभवासह दैवी मनुष्यांची ही हानी मोठ्या प्रमाणात होते. अर्थात येथे अकाली मृत्यूचाही आरंभ होतो. ज्या देव–देवता विनाशात वाचतात त्यांनी अशी भयानक आपत्ती पूर्वी कधीही पाहिली नसल्याने त्यांच्या मनावर फार मोठा आघात होऊन त्यांना आपल्या देवपदाची विस्मृती होते. ड्रामानुसार त्रेतायुगाचा विनाश होणे आवश्यक आहे. त्याशिवाय स्मृती–विस्मृतीचा हा अनाकलनीय खेळ पुढे जाणार नाही. हा विनाश झाला नसता तर द्वापरयुगातील मनुष्यांना आपल्या पूर्वजांचा (देव–देवतांचा) इतिहास यथार्थ ज्ञात झाला असता. फलस्वरुप अहिंसा परमोधर्माचे सहजपणे पूर्णतः पालन करणाऱ्या देव–देवतांच्या द्वापर युगात घडवलेल्या मूर्तींच्या पवित्र करकमलात हिंसक आयुधे दर्शविली गेली नसती. कोणत्याही बऱ्यावाईट उद्देशाने केलेल्या हिंसेत पापकर्म निश्चितच आहे. असे हे हिंसेचे कर्म देव–देवता कधीच करीत नाहीत. **देवता अर्थात् दैवी गुण असलेला, संपूर्ण अहिंसक दैवी मनुष्य. असुर अर्थात् कामक्रोधादि विकार असलेला साधारण मनुष्य.** बंधुनो, ज्यावेळी (सत्ययुग त्रेतायुगात) दैवी मनुष्य असतात त्यावेळी एकही आसुरीवृत्तीचा मनुष्य नसतो व ज्यावेळी (द्वापर–कलियुगात) कामक्रोधादि आसुरी वृत्तीचे लोक असतात त्यावेळी देव–देवता नसतात. म्हणून देव–देवतांचे व आसुरांचे युद्ध दर्शविणे हे अज्ञान व बालबुद्धीचे लक्षण आहे.

जो मनुष्यात्मा राजयोगाद्वारे गतजन्मांची विकर्मे भस्म करून दैवी गुण धारण करतो तोच भविष्यातील आपले देवपद प्राप्त करतो. परंतु ह्याच मनुष्यात्म्यात द्वापरयुगापासून देहाभिमानची उत्पत्ती होऊन आत्म्यांत आसुरी गुणांचा प्रवेश झाल्याने तो असुर बनतो. (आसुरी गुण कोणते आहेत ह्याचे मार्मिक व टीकात्मक वर्णन भगवद्गीतेच्या सोळाव्या अध्यायात आहे) आसुरी गुणांमुळे विशेषतः काम विकारामुळे आजचे मानवी जीवन कवडीतुल्य झाले आहे. ह्या कवडीतुल्य जीवनाला हिरेतुल्य बनविण्याचे उद्दीष्ट, परमेश्वराने समस्त ब्रह्मावत्सांना दिले आहे. संगमयुगात मज आत्म्याचे जीवन परमात्म्याने हिरेतुल्य बनविले आहे. हा संकल्प वारंवार मनी उत्पन्न झाल्यास कर्मात श्रेष्ठत्व येऊन, आपले जीवन निश्चितपणे हिरेतुल्य होईल. आपण आपले जीवन स्वपुरुषार्थाने हिरेतुल्य बनविले तरच सुवर्ण युगाची मंगल प्रभात होईल. ह्या सर्वश्रेष्ठ पुरुषोत्तम संगमयुगात परमात्मा बंधनयुक्त मनुष्य आत्म्याला, जीवनमुक्त व कर्मबंधनमुक्त स्थिती प्राप्त करवून आत्म्याचा उद्धार करीत आहे. जवळ जवळ ५००० वर्षापूर्वी सत्ययुगी मनुष्यात्मा श्रेष्ठ आचरणाच्या पहिल्या सुवर्ण पायरीवर स्थित होता. परंतु जन्म–मृत्यू बरोबरच आत्मिक पतनाच्या ८४ पायऱ्या उतरत असतानाच सत्व, रज, तम ह्या आत्म्याच्या तीन गुणांचे चक्र पूर्ण करून तो लोह युगातील भ्रष्टाचाराच्या काळ्या व अंतिम

पायरीवर येऊन पूर्णतः पतित झाला आहे. जो स्वर्गनिवासी होता तो नर्कवासी झाला आहे. कालचक्राच्या प्रवाहात बद्ध झालेल्या पूर्वाश्रमीच्या देवात्म्यांची स्थिती पाहून, परमात्म्याच्याही मनी हा संकल्प येत असावा की, 'कोण होतास तू काय झालास तू' **अशाप्रकारे आत्म्यांच्या भिन्न भिन्न स्थितींचे व त्या त्या स्थितीनुसार कर्म करण्याचे हे अटल चक्र, देवात्म्यांसहित सर्वच विश्वातील आत्म्यांना पतित बनविते. ह्या चक्रातून नर श्रेष्ठ व नारी श्रेष्ठ श्री लक्ष्मी नारायण ह्यांचीही सुटका नाही. एकमात्र अजन्मा निराकार परमात्मा सर्व प्रकारच्या मानवी चक्रातून मुक्त आहे. हाच महत्त्वपूर्ण भेद आहे; देहधारी मनुष्यात व विदेही परमात्म्यात!** असा मुक्तेश्वर परमात्मा, मनुष्यात्म्यांना कर्मबंधनातून मुक्त करून भविष्यातील दोन दैवी युगांसाठी मुक्ती व जीवनमुक्ती प्रदान करतो हाच त्या परमपित्याचा आत्म्याला प्राप्त झालेला वारसा हक्क होय! ''हे पूर्वाश्रमीच्या देवात्म्या, तुला आपल्या आदि व अनादि स्वरुपांची दिव्य स्मृती यावी म्हणून शिवपिता तुजला देहभान विसरावयास लावणारी ज्ञानमुरली ऐकवित आहे. हे ब्रह्मापुत्र, तुला पुनः आपल्या अलौकिक पित्याप्रमाणे प्रथम युगातील प्रथम जन्माची स्थिती गाठायची आहे. त्यासाठी तुला ह्या लोहतुल्य पायरीला हिरेतुल्य बनवायचे आहे. ह्याच पायरीवर तुला स्वतः शिवपिता परमधामी घेऊन जाण्यासाठी आला आहे. ह्या परमधामात अल्प काळाचा विश्राम करून तुला थेट आपल्या पहिल्या सुवर्ण पायरीवर अर्थात पहिल्या लक्ष्मी नारायणाच्या राज्यात पहिला जन्म प्राप्त करावयाचा आहे. **तूच आहेस आपल्या चैतन्य दैवी मूर्तीचा शिल्पकार! परमात्मा आहे स्वर्गीय दैवी मनुष्यसृष्टीचा शिल्पकार! ह्या शिल्पकाराच्या श्रीमताद्वारे तुला सर्वश्रेष्ठ अशा सूर्यवंशी कुळात जन्म प्राप्त करावयाचा आहे.''**

सत्ययुग व त्रेतायुगातील देवी-देवतांची आत्मिक स्थिती ही संगमयुगावर केलेल्या पुरुषार्थानुसारच बनलेली असते. या दोन्ही दैवी युगात आत्मिक पतन होऊ नये अथवा आत्मोन्नती साधली जावी म्हणून तेथे कोणताही सत्संग नसतो. सर्व देव-देवता आपल्या आत्मिक स्थितीनुसार त्या त्या युगात आपले आचरण सहजपणे करीत असतात. दैवी युगात माया (पांच मनोविकार) नसल्याने व शरीर सतोप्रधान असल्याने मनात कसल्याही प्रकारचे विकारी संकल्प निर्माण होऊ शकत नाहीत. फलस्वरुप त्यांच्या पवित्रतेच्या कला अत्यंत मंदगतीने कमी होत असतात. परमधामात आत्म्याच्या कला कधीही कमी होत नाहीत. परंतु आत्मा ह्या परिवर्तनशील पाच तत्त्वात गुरफटल्याने, त्याचे परिवर्तन अर्थात उतरती कला निश्चितपणे होत असते. प्रत्येक १२५० वर्षांनी प्रत्येक युगाची समाप्ती होऊन कमी गुणवत्ता असलेले युग येते. द्वापर युगापासून मनोविकारांची उत्पत्ती झाल्याने मनुष्यात्म्यांचे पतन शीघ्र गतीने होऊ लागते. ह्या युगाच्या अंताला आत्म्याच्या उरल्या सुरल्या पवित्रतेच्या कला कमी होऊन आत्मा पूर्णतः निस्तेज होतो. **ह्या कलियुगातील अंतिम चरणात कामक्रोधादि पाच मनोविकारांचे प्राबल्य वाढल्याने आत्म्याची स्थिती व आचरण तमोप्रधान झाले आहे. विकारी मनुष्यात्म्यांना हे ज्ञान नसते की, सत्ययुगातील संपूर्ण निर्विकारी असलेल्या देव-देवता आपलेच पूर्वज होते तसेच ते कामविकारातूनही मुक्त होते.** जेथे कामराज्य नसते तेथेच रामराज्य असते व जेथे कामराज्य आहे तेथे रामराज्य निर्माण होऊच शकत नाही. अर्थात् ते रावणराज्य आहे असे समजावे. ह्या रावण राज्यात कामविकाराचा स्वैराचार वाढल्याने प्रेमी युगलांचे विवाह होण्यापूर्वीच शारीरिक संबंध येऊ लागले आहे. त्यातूनच 'मैं तुम्हारे बच्चेकी माँ बननेवाली हूँ।' ह्या धक्कादायक वाक्याची निर्मिती झाली आहे. **ह्या कामविकाराला भगवद्गीतेत महाशत्रू व नरकाचे द्वार म्हटले आहे. परंतु कलियुगात मात्र मनुष्यात्म्यांनी त्याला 'महामित्र' मानून ते त्याच्या पूर्णतः अधीन झाले आहेत.** मनुष्य आपल्या नोकरीतून निवृत्ती घोषित करतो. परंतु त्या कामविकारातून निवृत्ती घेणारा कोणी विरळाच असतो. आत्म्याला पतित बनविणारी ही

अकल्याणकारी क्रिडा बंद करावयाची असेल तर बुद्धिरुपी पात्रात परमात्म्याने प्रदान केलेली ज्ञानरत्ने संकलित करून ह्या अलौकिक क्रिडेला आरंभ कराल तर रत्नाकर परमात्मा तुमच्या भृकुटीतील आत्मारुपी हिऱ्याला पावनतेचे पैलू पाडील. **त्यासाठी ब्रह्माकुमारी विद्यालयात नियमितपणे जाणे आवश्यक आहे. येथे बेलगाम कामविकाराला पूर्णतः लगाम लावणे शिकवितात.** मनुष्याने कुटुंब नियोजन करून वाढत्या लोकसंख्येला लगाम अवश्य घातला आहे. परंतु ह्या कामविकाराला मात्र तो लगाम घालू शकला नाही. कुटुंब नियोजनाच्या साधनांच्यामुळे तर त्याचा स्वैराचार अधिकच वाढला आहे. जर कुटुंब नियोजनाची ही साधने निर्माण झाली नसती तर कदाचित मुलाचा व नातवाचा जन्म एखाद्या वर्षाच्या अंतराने झाला असता. ह्या विकाराचे समर्थन करताना म्हटले जाते की, हा विकार प्राकृतिक आहे. त्याला प्राकृतिक त्याचवेळी म्हणता येईल ज्यावेळी वंशवेल वाढवायचा असेल. स्त्री बीज व पुबीज एकत्रित होऊन फल (संतती) प्राप्ती होणे हाच प्रकृती धर्म अथवा प्रकृतीचे व्यवस्थापन आहे. जनन इंद्रिय हा शब्दच सांगतो की, त्याचा उपयोग केवळ जननासाठी आहे. म्हणून आपल्याच धर्मशास्त्राचा अभ्यास करून ह्या विकाराला पूर्ण विराम द्यावा गीताज्ञान हे कोणा संन्याशाला सांगितले नसून खास गृहस्थींसाठी सांगितले आहे म्हणून गीताज्ञान अर्जन करणारा अर्जुन गृहस्थी दर्शविला आहे. हा विकार पुण्यात्म्याला पापात्म्यात परिवर्तित करणारा आहे. आत्मा जितका पतित होईल तितकी त्याला दुःखेही प्राप्त होत असतात. म्हणून शिवबाबांनी म्हटले आहे- **''यह कामविकार आदि, मध्य व अंतमे दुःख देनेवाला है। अतः तुम्हे कामजीत और जगतजीत बनना है। अर्थात मै तुम्हे विश्वका मालिक बनाता हूँ।'' आत्म्याला पतित स्थिती प्राप्त होते हे परमात्म्यासहित सकल संतमहात्म्यांनी स्पष्ट केले आहे** असे हे वैश्विक सत्य असूनही विकाराधीन समाज ह्या सत्याकडे अर्थात भगवद्गीतेकडे दुर्लक्ष करीत आहे.

चिंतन करा, रामदास स्वामींच्या कानी 'सावधान' हे शब्द पडताच त्यांनी विवाह मंडपातून शीघ्र गतीने पलायन का केले? स्वामी विवेकानंदांच्यावर लुब्ध होणाऱ्या परदेशी युवतीला ते असे कां म्हणाले की, 'हे माते, तुला जर माझ्यासारखाच तेजस्वी पुत्र हवा आहे तर तू मलाच आपला पुत्र समज!' स्वामी रामकृष्ण परमहंस व एकनाथ महाराजांनी आपल्या पत्नीला माता का मानले होते? अशीच असती आमुची आई सुंदर रुपवती, आम्हीही सुंदर झालो असतो' असे ऐतिहासिक, अनपेक्षित परंतु चारित्र्यसंपन्न उद्गार कल्याण येथील सुभेदाराच्या सुनेला पाहून छत्रपती शिवाजी महाराजांनी का काढले असावेत? भारतात कुमारी कन्येचे पूजन का केले जाते? लौकिक ब्राह्मण आपल्या आठ-दहा वर्षांच्या मुलाचे व्रतबंध का करतो? त्यामागे कोणत्या व्रताचे बंधन आहे? शंकराचार्यांनी 'संन्यासधर्म' का स्थापन केला? एखाद्या गावात एखादा संन्याशी आला तर गृहस्थी त्याच्यापुढे नतमस्तक का होतात? संत सूरदासांनी आपले नेत्र कामविकारामुळे निकामी केले. साध्वी मीराबाईने विषाचा प्याला घेणे पसंत का केले आणि **वर्तमान समयी परमात्मा असे का सांगत आहे की, 'आप ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारीयाँ ब्रह्माकी अलौकिक संतान होने के कारण आपका अलौकिक संबंध भाई-बहन का है और तुम सभी मनुष्य आत्माएँ मेरी संतान होनेके कारण आपसमें भाई-भाई हो। अतः तुम्हारी विकारी दृष्टी (क्रिमिनल आय) किसीपर भी जा नही सकती।'** परमात्म्याच्या ह्या कल्याणकारी मार्गदर्शनावरही टीका केली जाते; हे दुर्दैव होय! अशाप्रकारे परमात्म्यासहित अनेक सत्पुरुषांनी हेच मार्गदर्शन केले होते की, हा कामविकार मानवी जीवनाचे व आत्म्याचे पतन करणारा आहे. पतितापासून पावन बनण्यासाठी पहिला त्याग हा कामविकाराचाच करावा लागतो. द्वापरयुगापासून कलियुगाच्या अंतिम चरणापर्यंत ऋषी मुनी, धर्मस्थापक आत्मे, संतमहात्मे ह्यांनी आपल्या आध्यात्मिक कार्याद्वारे मनुष्यात्म्यांच्या

पतनाच्या गतीला प्रतिबंध अवश्य केला होता. परंतु ते मनुष्यात्म्यांची गती व सद्गती मात्र करू शकले नाहीत. तरीही हे मान्य करावे लागेल की त्यांनी हे कार्य केले नसते तर ह्या कलियुगी सृष्टीचा महाविनाश कधीच झाला असता. म्हणून ह्या महानाट्यात धर्मपित्यांच्या, संत महात्म्यांच्या भूमिका यथार्थ होण्यासाठी त्यांचा पहिला सतोगुणी जन्म द्वापर व कलियुगातच होत असतो. ह्या सर्वांविषयी आपल्या मनात नितांत आदर व प्रेम असले तरी हे कटुसत्य भक्तजनांनी स्वीकारावे की, त्यांचा जन्म कोणत्याही दैवी युगात होऊ शकत नाही. अशाप्रकारे सर्वोच्च परमात्म्याच्या सर्वोच्च कार्याला व संतमहात्म्यांच्या कार्याला यथार्थ जाणावे.

ह्या मनुष्यसृष्टीतील युग परिवर्तनाचा शुभ समाचार हाच आहे की माया रावणाला २५०० वर्षांसाठी मूर्च्छित करून सुख-शांती संपन्न अशा सत्ययुगाची स्थापना करणारा कल्याणकारी निराकार शिवपिता ह्या पुरुषोत्तम संगमयुगात कधीच अवतरित झाला आहे. त्याच्या अवतरण काळाच्या विशेष युगात तो भ्रष्ट आचरण करणाऱ्या पुरुषापासून श्रेष्ठ असे निर्विकारी आचरण करणाऱ्या पुरुषोत्तमाची रचना करतो.

***

(पान क्र. ६ वरून)

'हे' नाही तर 'ते' पद तरी मलाच मिळावं, मीसुद्धा यज्ञातला जुना, अनुभवी ब्रह्मावत्स आहे. इतरांना परदेशगमनाची संधी मिळते तशी यंदा मलाही मिळावी या आणि अशा इच्छा बाळगून बुद्धी भटकत असल्यास योग लागणार नाही. आपण इच्छा पूर्णपणे संपवू शकत नाही; पण त्यांची गती कमी करू शकतो. एक इच्छा दुसऱ्या इच्छेला जन्म देत असते. त्याप्रमाणे इच्छा कमी करण्यासाठी इच्छाशक्तीच हवी. एका पौराणिक कथेनुसार कार्तिकेय व गणपती दोघांमधे विश्वपरिक्रमा करून कोण आधी पोहोचतो अशी शर्यत लागते. कार्तिकेय मोरावर आरूढ होऊन लगेच निघतो. शंकर-पार्वती पाहतात तर गणेश आपला तिथेच उभा! 'आपण जिथे आहात, तिथेच माझे सारे विश्व आहे. मग धावाधाव करत सगळीकडे जाण्याची गरजच काय' असं नम्रपणे माता-पित्याला प्रदक्षिणा घालताना गणेश उत्तरतो. या पुरुषोत्तम संगमयुगात शिवबाबांचा सत्य परिचय मिळाला, सारं काही मिळालं. प्रत्यक्ष परमात्मा सर्व संबंधांनी आपला झाला आहे. पतित विश्वाला पावन करण्याच्या ईश्वरी कार्यात सहयोगी बनणं, हेच आता आपल्या जीवनाचं श्रेष्ठ कर्तव्य असायला हवं. योगी जीवन घडवण्यासाठी आवश्यक आहे -

१. सर्व संबंध एका परमेश्वराशी जोडणं

२. इच्छा कमी करणं.

३. योग सहज स्वाभाविक कसा होईल यासाठी पुरुषार्थ करणं

४. मनाची एकाग्रता साधण्याचा प्रयत्न करणं. 'मेरा तो एक शिवबाबा' अशी अनन्य प्रीत असेल, तर संगमयुगी जीवन सहजयोगी होईल.

(ज्ञानसुधा - भाग २)

भावानुवाद : ब्र. कु. मिनल

ठाणे (पश्चिम) सेवाकेंद्र .

***

(पान क्र. १२ वरून)

काही केलं होतं हे मला मात्र या घटनेनंतर बऱ्याच दिवसांनी कळलं होतं. असो ! शुक्रवारच्या सकाळी मला भेटायला तो खूप आतुर होता. अतिशय आनंदाने त्याने मला सगळी कहाणी सांगितली. तो वारंवार माझे आभार मानू लागला आणि मी काय बोलणार यावर? खरोखरीच जादू करणारा बाबा होता. मी फक्त शुद्ध भावनेपोटी बाबांजवळ एका मनुष्यात्म्याची समस्या सांगितली होती. पुढे त्याला कधीही हा त्रास झाला नाही. आजही त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद आठवला तरी माझ्या मनांत एकच लहर उमटते - बाबा तू किती प्रेमळ आहेस रे!

***

अविनाशी रुद्र गीता ज्ञान यज्ञाचा परिचय, उद्दिष्ट व प्राप्ती

ब्र.कु. रामकृष्ण महाले, वाशिम

ज्ञानाचा सागर, सर्वांचा सद्गतिदाता, निराकार परमपिता, परमशिक्षक, परमसद्गुरू 'शिव' परमात्म्याने साकार प्रजापिता ब्रह्माद्वारे १९३७ साली भारतात 'अविनाशी रुद्र गीता ज्ञान यज्ञाची' अर्थात् 'प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाची' स्थापना केली. याचे मुख्यालय राजस्थानच्या आबू पर्वतावरील 'मधुबन' या शांत, रम्य ठिकाणी आहे. सहज राजयोगाद्वारे पवित्र, योगी तसंच तणावमुक्त जीवनाची प्राप्ती करवून देण्याचे, एकाग्रता, कार्यक्षमता वाढवण्याचे, व्यवहार कौशल्याबरोबरच सद्गुणांचा विकास व दुर्गुणांचा नाश करण्याचे प्रशिक्षण येथे दिले जाते. त्यायोगे मानव आपले जीवन पवित्र, निर्मळ व श्रेष्ठ करु शकतो. शिक्षण हे केवळ नोकरी-धंदा करण्यासाठी नव्हे तर जीवन श्रेष्ठ करण्यासाठीच आहे.

या विश्व विद्यालयास आंतरराष्ट्रीय मान्यता असून पाच खंडांतील सुमारे १४० देशांत ह्याची अंदाजे ४००० सेवाकेंद्रे आहेत. याव्यतिरिक्त अनेक ठिकाणी ईश्वरी ज्ञान व राजयोगाचे क्लास चालतात. एक बिगर सरकारी संस्था या नात्याने हे विश्व विद्यालय, संयुक्त राष्ट्र संघाच्या आर्थिक व सामाजिक सल्लागार समितीचे तसेच सार्वजनिक माहिती खात्याचे सदस्य असून युनिसेफशी (यु.एन.आय. सी.ई.एफ.) संबंधित आहे. संयुक्त राष्ट्र संघाने एक शांती पदक, एक आंतर्राष्ट्रीय व पांच राष्ट्रीय 'शांतिदूत' पुरस्कार देऊन या ईश्वरीय विश्व विद्यालयाला सन्मानीत केले आहे.

या संस्थेत कोणत्याही प्रकारे जात-पात, मठ-पंथ, वर्ण-लिंग, वय, भाषा व धर्म तसेच देशाचा भेदभाव केला जात नाही. आत्मिक नात्याने सर्वजण भाऊ-भाऊ आहेत, विश्व एक परिवार आहे असे समजून बंधुत्वाचे शिक्षण दिले जाते. येथील प्रशासन मुख्यत्वे महिला सांभाळतात कारण स्त्रियांमध्ये सहनशीलता, दया, क्षमा, शांती, त्याग, समर्पण, जिव्हाळा, संयम, भावना प्रामुख्याने असतात. येथील शिक्षण नि:शुल्क दिले जाते.

संन्यासमार्ग वा भक्तिमार्गातील कर्मकांडात न गुंतता वैज्ञानिक, आध्यात्मिक वस्तुस्थितीच्या आधारावर हे विश्व विद्यालय उभे आहे. ज्ञानगंगारुपी आत्म्यांची गंगासागररुपी परमात्म्याशी मधुर भेट जिथे होते, तेच हे पावन संगम स्थान आहे. येथील ब्रह्मावत्स ज्ञानगंगा बनून विश्वाला पावन बनविण्याची श्रेष्ठ सेवा करतात.

आजच्या सर्व समस्यांचे निराकरण करण्याचे एक नवीन, परिणामकारक साधन म्हणजे हे आगळे-वेगळे ईश्वरीय विश्व विद्यालय होय. इथे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांमध्ये प्रचंड आत्मविश्वास आहे. त्यांची भाषणे ऐकून मंत्रमुग्ध झालेली प्रत्येक व्यक्ती तृप्त मनाने पवित्र, निर्व्यसनी, निर्विकारी व निरहंकारी होण्याचे ठरवूनच परतते. ईश्वरी ज्ञानामुळे सकारात्मक विचार करण्याची प्रेरणा मिळते.

संपूर्ण विश्वातील मनुष्यात्म्यांसाठी स्थापन झालेल्या आध्यात्मिक विश्व विद्यालयात 'विश्वपिता' शिव परमात्मा शिकवतात. या रुद्र गीता ज्ञान यज्ञात प्रज्वलित झालेल्या ज्ञान-योगाच्या अग्नीने, विश्वातील असत्य, अज्ञान, अंधश्रद्धा व धर्मग्लानी नष्ट करून, कलियुगी मनुष्यात्म्यांना दैवी गुणसंपन्न देवता बनवून, सत्ययुगाची (स्वर्गाची) स्थापना होते. (क्रमशः)

***

खोपोली – कोरोना महामारीच्या सेवेत उपस्थित असलेल्या पोलीस कर्मचार्यांना संस्थेद्वारे ब्रह्माभोजन करवताना ब्र. कु. मनीषा

भिलवडी (सांगली) – स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मॅनेजर सोनाली मॅडमना ईश्वरीय भेटवस्तू देताना ब्र. कु. मीरा

रहाटणी (पुणे) – गरजूंना संस्थेद्वारे अन्नधान्य वाटप करताना ब्रह्माकुमारी बहीण.

सुरत– गरजू लोकांना भोजन वितरण करताना ब्रह्माकुमारी बहीण व भाऊ.

परभणी– मातृदिनाच्या निमित्ताने मुख पट्ट्यांचे वाटप करताना ब्र. कु. सोनल व सोबत पोलिस अधिकारी.

झरी परभणी – 'ईश्वरीय शक्तीद्वारे सुखी जीवन' या विषयावरील कार्यक्रमात जिल्हा परिषद सदस्य भ्राता गजानन देशमुख, डॉ. चोपडा, ब्र. कु. प्रणिता, ब्र. कु. अर्चना

Registration No. : MAHMAR/2007/21914

राजयोगाद्वारे स्वस्थ मानव जीवन

२१ जून - आंतरराष्ट्रीय योग दिवस